दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६४ वे अंक १७०) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२४ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार, दि.०४ जुलै २०२५ (पाने ४) (किंमत २ रूपये)

## वाळू वाहतुकीसाठी चोवीस तास मार्ग मोकळा; शासनाचा निर्णय!

नागपूर दि.३ (प्रतिनिधी)- राज्यात वाळू वाहतुकीसंदर्भातील दीर्घकाळ प्रलंबित असलेला निर्णय अखेर घेण्यात आला असून, सकाळी ६ ते सायंकाळी ६ या कालावधीत उत्खनन केलेल्या वाळूची वाहतूक आता २४ तास करता येणार आहे, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत केली.

'सद्यस्थितीत सकाळी ६ ते सायंकाळी ६ या वेळेतच वाळूचे उत्खनन परवानगीने होते. पण दिवसभरात साठवलेली वाळू रात्री उचलता न आल्यामुळे वाहतूक क्षमतेचा योग्य उपयोग होत नाही आणि त्यामुळे अवैध वाहतूक वाढते. ही परिस्थिती बदलण्यासाठी महाखनीज पोर्टलवरून २४ तास ईटीपी तयार करता येईल अशी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.'असे बावनकुळे म्हणाले. वाहतुकीच्या पारदर्शकतेसाठी शासनाने विविध उपाययोजना केल्या असून, प्रत्येक वाळूघाटाचे जिओ-फेन्सिंग केले जाणार आहे. घाट व मार्गांवर सीसीटीव्ही बसवले जाणार वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांना डिव्हाइस अनिवार्य करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगीतले.

# विधानसभेत शेतकऱ्यांच्या मुद्यावर चर्चा सुरू असताना कृषिमंत्रीच अनुपस्थित

## काँग्रेसचे विजय वडेट्टीवार, शिवसेना ठाकरे गटाचे भास्कर जाधव आक्रमक

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा आज चौथा दिवस होता. मागील ४ दिवसांत विधिमंडळात भाजप आमदार बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्यांविरोधात केलेल्या एका वादग्रस्त विधानाचे तीव्र पडसाद उमटले. या प्रकरणी विरोधकांनी सभात्याग करत सभागृहाच्या कामकाजावर बहिष्कारही टाकला. विशेषतः या प्रकरणी झालेल्या गदारोळात काँग्रेस आमदार नाना पटोले यांच्यावर एका दिवसाच्या निलंबनाची कारवाई करण्याची वेळही आली. त्यानंतर आजही काँग्रेस वेगवेगळ्या मुद्यांवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारला धारेवर धरण्यात आले. त्यानंतर, विधानसभेत शेतकऱ्यांच्या मुद्द्यावर चर्चा सुरू असताना कृषिमंत्रीच सभागृहात उपस्थित नव्हते. यावरून काही काळासाठी विरोधक आक्रमक झाले होते.

शेतकऱ्यांचा मुद्दा विधानसभेत चर्चिला जात असताना कृषिमंत्रीच सभागृहात उपस्थित नव्हते. तसेच संबंधित अधिकारी देखील नव्हते. यावरून विजय वडेट्टीवार, नाना पटोले तसेच सुधीर मुनगंटीवार व सुरेश धस यांनी देखील नाराजी व्यक्त केली.

विधानसभेत बोलताना शिवसेना ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी शेतकऱ्यांचा मुद्दा उपस्थित करत सरकारवर चांगलाच हल्लाबोल केला. तसेच शेतकऱ्यांना नुकसानभरपाई म्हणून ५० हजार रुपये देण्यात यावे, अशी मागणी देखील त्यांनी केली आहे.

भास्कर जाधव म्हणाले, मे महिन्यात अवेळी पाऊस पडला. यामुळे अनेक ठिकाणी नद्यांचे पाणी पात्राबाहेर गेले आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. १४ मे पासून रोजच पाऊस सुरू झाला. या पावसाने मोठी दाणादाण उडवली आहे. मराठवाड्यातील व विदर्भातील २६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. ही आकडेवारी जानेवारी ते मार्च पर्यंतच्या आहेत. वर्षभरात हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. मागच्या निवडणुकीच्या वेळी त्यांना आश्वासने दिली होती. आम्ही सात बारा कोरा करू असे सांगण्यात आले. पण आता हे सरकार म्हणत आहे कर्जमाफी करू, पण योग्यवेळी करू. लाडक्या बहिणींना म्हणाले २१०० रुपये देणार, नाही दिले. हे आश्वासने केवळ निवडणुकीपुरते होते.

पर हेक्टरी शेतकऱ्यांना नुकसानभरपाई म्हणून किमान ५०००० रुपयांची तात्काळ मदत करण्याची गरज आहे. पंचनामे झालेले नाहीत. ऑनलाइन पद्धतीने पंचनामे केले जात आहेत, पण त्या ठिकाणी नेटवर्कच नसेल तर काय करणार? शेतकऱ्यांना माहिती देणे गरजेचे आहे. ऑफलाइन पद्धतीने देखील पंचनामे केले जावेत, अशी माझी मागणी आहे. शेतकऱ्यांचे कर्जमाफी केले जावे, सौरऊर्जा प्रकल्प मोफत देण्यात यावे, किती जणांकडे आहे सौरऊर्जा प्रकल्प? एक रुपयात पिकविमा ही योजना फसवी ठरली असेही भास्कर जाधव म्हणाले.

# महाराष्ट्रात आत्महत्या केलेल्या ७६७ शेतकऱ्यांचे घरे उद्धवस्त-राहुल गांधी

## केंद्रासह महाराष्ट्रातील सरकार शेतकऱ्यांच्या दुर्दशेबद्दल उदासीन असल्याचा आरोप



नवी दिल्ली दि.३ (वृत्तसंस्था)- महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवरून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मोदी सरकारवर आणि महायुती सरकारवर हल्लाबोल केला. ते म्हणाले की, केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या दुर्दशेबद्दल उदासीन आहे, तर शेतकरी दिवसेंदिवस कर्जाच्या ओझ्याखाली अधिकाधिक बुडत आहेत. एक्सवरील एका पोस्टमध्ये राहुल गांधी यांनी सरकारवर कर्जमाफी आणि पिकांसाठी किमान आधारभूत किमतीची (एमएसपी) कायदेशीर हमी या शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला. त्यांनी लिहिले की, 'कल्पना करा... महाराष्ट्रात फक्त तीन महिन्यांत ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. ही फक्त एक आकडेवारी आहे का? नाही. ही ७६७ उद्धवस्त घरे आहेत. ७६७ कुटुंबे जी कधीही सावरू शकणार नाहीत आणि सरकार? गप्प आहे. उदासीनतेने पाहत आहे.' 'शेतकरी दिवसेंदिवस कर्जात बुडत आहेत'

राहुल गांधी म्हणाले की, 'शेतकरी दिवसेंदिवस कर्जात बुडत आहेत, बियाणे महाग आहेत, खते महाग आहेत, डिझेल महाग आहे.. पण किमान आधारभूत किमतीची हमी नाही. जेव्हा ते कर्जमाफीची मागणी करतात तेव्हा त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते. पण ज्यांच्याकडे कोटी आहेत? मोदी सरकार त्यांचे कर्ज सहजपणे माफ करते. आजच्या बातम्या पहा, अनिल अंबानींचा ४८ हजार कोटी रुपयांचा एसबीआय घोटाळा आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले होते की ते शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट करतील, आज परिस्थिती अशी आहे की शेतकऱ्याचे आयुष्य अर्धे होत आहे. ही व्यवस्था शेतकऱ्यांना मारत आहे. शांतपणे, पण सतत आणि मोदीजी स्वतःच्या जनसंपर्काचा तमाशा पाहत आहेत असे राहुल गांधी म्हणाले.

## ठाकरे बंधुंच्या विजयी मेळाव्याला जयंत पाटील उपस्थित राहणार; शरद पवार यांची माहिती

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- सरकारनं त्रिभाषा धोरणाबाबतचा निर्णय रद्द केल्यानंतर ठाकरेंची शिवसेना आणि मनसे ५ जुलै रोजी विजयी मेळावा साजरा करणार आहे. मुंबईतील वरळी डोम येथे ठाकरेंची शिवसेना आणि मनसे यांचा एकत्रित भव्य मेळावा होणार आहे. या मेळाव्यावा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष उपस्थित राहणार का? याबाबत खुद्द शरद पवारांनाच विचारण्यात आले. यावेळी शरद पवार म्हणाले की, काल पार्टीचे अध्यक्ष जयंत पाटील मला भेटले होते. त्यांनी सांगितलं आहे की, जे आंदोलन सुरू आहे त्याला पक्षाने पाठिंबा दिला आहे. त्यामध्ये सहभागी देखील होणार आहेत. त्यामुळं पक्षांच्या अध्यक्षांचा आदेश मी मानतो असे शरद पवार म्हणाले. मी त्या कार्यक्रमाला जाणार नाही, कराण माझे दुसरीकडे कार्यक्रम असल्याची माहिती शरद पवार यांनी दिली.

वारीमध्ये अर्बन नक्षलवाद घुसल्याचा दावा शिवसेनेच्या आमदार मनिषा कायंदे यांनी केला होता. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. वारीतील घुसखोरीबाबत काल दोन संस्थांची नावे बाहेर आली आहेत. त्यातील लोकायत एक संस्था आहे. ती संस्था अनेक चांगली कामे करत आहे, ती नक्षली नाही. मागे काही लोकांना अनेक वर्षे तुरुंगात टाकलं होतं. नक्षली शिक्के मारण्याचं काम केले जात असल्याचे शरद पवार म्हणाले. श्यामसुंदर सोन्नर हे अनेक वर्षापासून चांगलं काम करत आहेत. चांगली काम करणाऱ्यांवर शिक्के मारले जात आहेत असे पवार म्हणाले.

## भाजप डरपोक लोकांची 'डी गँग'-संजय राऊत

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- आजचा भारतीय जनता पक्ष म्हणजे डरपोक लोकांची 'डी गँग' असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. नाशिक मधील उद्धव ठाकरे गटाच्या नेत्यांचा भारतीय जनता पक्षात प्रवेश होणार आहे. या पार्श्वभूमीवर संजय राऊत यांनी भाजप उद्या दाऊद इब्राहिम याला देखील पक्षात प्रवेश देईल, असा आरोप केला. इतकेच नाही तर केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी केलेल्या आरोपांना देखील त्यांनी प्रत्युत्तर दिली आहे. (पान ४ वर)

## संत ज्ञानेश्वर माऊली व संतश्रेष्ठ सोपान काका महाराजांच्या पालखीची भेट




सोलापूर दि.३ (प्रतिनिधी)- भेट संतबंधूंची, आभाळ आले भरून, पालखी त्या दोघांची आपल्या मार्ग निघाली.. या काव्यपंक्ती प्रमाणे कैवल्य साम्राज्य संत ज्ञानेश्वर महाराज व संतश्रेष्ठ सोपान काका महाराज या संत बंधूंच्या भेटीचा हृदय सोहळा गुरुवारी (दि. ३) दसूर (ता. माळशिरस) जवळ झाला. तोंडले येथील विसाव्यानंतर वारकऱ्यांना संत बंधूंच्या भेटीच्या सोहळ्याची आस लागली होती. भेटी सोहळ्याच्या दरम्यान आकाशात ढगांची दाटी झाली, मधूनच पडणाऱ्या पावसाच्या सरी अशा प्रसन्न वातावरणात बंधू भेटीचा हृदय सोहळा पाहताना भाविकांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले.

संत सोपानकाका महाराजांचा पालखी सोहळा बंधू ज्ञानदेवाच्या भेटीसाठी दसूर पाटीजवळ रस्त्याच्या उजवीकडील बाजूस ज्येष्ठ बंधू ज्ञानदादाची वाट पहात थांबला होता. त्या सोहळ्यातील वारकऱ्यांनी फुगड्या अन् भारुडांचे सादरीकरण (पान ४ वर)

## पंतप्रधान मोदींचा घानामध्ये राष्ट्रीय पुरस्काराने सन्मान



ॲक्रो दि.३ (वृत्तसंस्था)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी घानाच्या संसदेला संबोधित केले. ते म्हणाले, 'आज या प्रतिष्ठित सभागृहाला संबोधित करताना मला अभिमान वाटतो. घानामध्ये असणे हा एक विशेषाधिकार आहे. ही लोकशाहीच्या भावनेने भरलेली भूमी आहे. घाना संपूर्ण आफ्रिकेसाठी प्रेरणास्थान आहे.

'भारत लोकशाहीची जननी आहे. आमच्यासाठी ही व्यवस्था नाही, तर एक परंपरा आहे. जगातील सर्वात मोठी (पान ४ वर)

## दिशा सालियन प्रकरणात आदित्य ठाकरेंना दिलासा, मुंबई पोलिसांची कोर्टात महत्त्वाची माहिती

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- दिशा सालियन मृत्यूप्रकरणी तिचे वडील सतीश सालियन यांनी दाखल केलेल्या याचिकेवर भूमिका स्पष्ट करण्यासाठी हायकोर्टानं राज्य सरकारला दोन आठवड्यांची अंतिम मुदत दिलीय. बुधवारी या प्रकरणावर न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती राजेश पाटील यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. याप्रकरणी हायकोर्टानं राज्याच्या मुख्य सचिवांना उत्तर देण्याचे आदेश दिलेले असतानाही मालवणी पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी उत्तर दिल्याची बाब याचिकाकर्त्यांनी हायकोर्टाच्या निदर्शनास आणून दिली. तसेच या प्रकरणी आदित्य ठाकरेंनी दाखल केलेल्या हस्तक्षेप याचिकेवरही सतीश सालियन यांच्यावतीनं वकील निलेश ओझा यांनी कोर्टात उत्तर दाखल केलं आहे. ज्यात आदित्य ठाकरे हेच या प्रकरणातील मुख्य आरोपी असल्यानं त्यांना यात याचिका दाखल करण्याचा अधिकारच नसून त्यांची याचिका फेटाळून लावण्याची विनंती करण्यात आली आहे.

मुंबई पोलिसांकडून याचिका फेटाळण्याची विनंती करण्यात आली आहे. याप्रकरणी तपासाची प्राथमिक फेरी पूर्ण झालेली आहे. दिशाचा मृत्यू हा अपघाती असून, त्यात कोणताही घातपात किंवा हत्येचा प्रयत्न झाल्याचं आढळून आलेलं नाही. म्हणून दिशाच्या मृत्यूची अपघाती नोंद करत या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता नसल्याचं सांगत मालवणी पोलीस ठाण्यातील वरीष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांनी प्रतिज्ञापत्र सादर करीत याचिका फेटाळून लावण्याची विनंती हायकोर्टाकडे केली आहे.

दरम्यान, या प्रकरणावर खुद्द आदित्य ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ठराविक लोकांकडून गेल्या ५ वर्षात बदनामीचा प्रयत्न झाला. मी त्यांना कधी उत्तर दिली नाही, आजही देणार नसल्याची प्रतिक्रिया आदित्य ठाकरे यांनी दिली. ज्या विषयाशी माझा संबंध नाही, ज्याची मला माहितीही नाही, त्याबाबत मी बोलणार नाही असे ठाकरे म्हणाले.

शेतकरी आत्महत्येच्या मुद्यावरुन शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी सरकारवर टीका केली. आम्ही शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भात प्रश्न विचारत आहोत. कर्जमाफी झाली असती तर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या नसत्या असे मत आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केले. ससून डॉक परिसरात राहणाऱ्या कोळी बांधवांना सरकारने न्याय द्यावा हीच आमची मागणी असल्याचेही आदित्य ठाकरे म्हणाले.

## वाल्मीक कराडच्या चेल्याकडून गतिमंद तरुणीवर लैंगिक अत्याचार

बीड दि.३ (प्रतिनिधी)- बीडच्या केज तालुक्यामध्ये एका गतिमंद तरुणीवर अत्याचार केल्याची संतापजनक घटना घडली समोर आली आहे. २ जून रोजी सदर तरुणी आपल्या नातेवाईक महिलेसोबत आरोग्य उपकेंद्रात जात असताना एकेठिकाणी थांबली होती. यावेळी नानासाहेब चौरे या नराधमाने या गतिमंद तरुणीवर अत्याचार केला. हा प्रकार सोबत असलेल्या महिलेच्या निदर्शनास आल्यानंतर त्या महिलेला देखील कोणाला काही सांगू नको असे म्हणत धमकावले. आरोपी नानासाहेब चौरे याला पोलिसांनी अटक केली असून त्याच्यावर आता केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता अधिकचा तपास केज पोलीस करत आहेत.

दोन जून रोजी सदर तरुणी आपल्या नातेवाईक महिलेसोबत आरोग्य उपकेंद्रात जात असताना काही काळ एका ठिकाणी थांबली होती. यावेळी तिला तेथेच थांबवून ती महिला उपकेंद्रात गेल्यानंतर नानासाहेब चौरे यांनी या गतिमंद तरुणीवर अत्याचार केला. हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर त्याच्यावर केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आता अधिक तपास पोलीस करत आहेत.

## उद्धव ठाकरेंकडूनच राज ठाकरेंच्या घातपाताचा प्लॅन

### रामदास कदमांचा खळबळजनक दावा

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रात शिवसेना-मनसे म्हणजेच ठाकरे बंधू एकत्र येण्याची चर्चा जोरदार सुरू असून ५ जुलै रोजी विजयाचा जल्लोष साजरा करण्यासाठी दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते एकत्र येत आहेत. शाळेतील इयत्ता पहिलीपासून हिंदी किंवा इतर भाषा सक्तीचा शासन आदेश मागे घेण्यात आल्यानंतर ठाकरे बंधूंकडून आवाहन करण्यात आलेला मोर्चा रद्द करण्यात आला. मात्र, ५ तारखेला मराठीच्या मुद्द्यावरुन विजयाचा जल्लोष केला जाणार आहे. त्यामुळे, ठाकरे बंधूंच्या एकीची चर्चा सुरू असतानाच दुसरीकडे महायुतीमधील काही नेते किंवा बाळासाहेब ठाकरेंसमवेत शिवसेनेत काम केलेले वरिष्ठ नेते आपली प्रतिक्रिया देत आहेत. खासदार नारायण राणे यांच्यानंतर आता राज-उद्धव युतीवर माजी मंत्री व ज्येष्ठ नेते रामदास कदमांनी स्फोटक मुलाखत दिली. राज ठाकरेंना जीवे मारण्याचा कोणाचा डाव होता? असा थेट सवाल कदम यांनी विचारला आहे.

राज उद्धव ठाकरेंच्या संघर्षाची रामदास कदमांनी चिरफाड करण्याचा प्रयत्न आपल्या मुलाखतीमधून केला आहे. राज ठाकरेंना जीवे मारण्याचा डाव कुणाचा होता? असा सवाल उपस्थित करत कदमांनी एकप्रकारे गौप्यस्फोटच केला आहे. कणकवलीत राज ठाकरेंसोबत काय घडणार होतं ? राज ठाकरे उद्धव ठाकरे एकत्र येण्यानं हितं कसं होणार? राज-उद्धवच्या युतीत कुणाचा बळी जाईल? रामदास कदमांनी राज ठाकरेंच्या डोळ्यात कधी पाणी पाहिलं ? विजय सभा काढायला नेमका कोणाचा विजय झाला? यासह अनेक प्रश्नांची उत्तरे कदम यांनी आपल्या मुलाखतीतून दिली आहे.

## आदिवासींच्या निधीवरुन विधान परिषदेत खडसे आक्रमक

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- आदिवासी आणि सामाजिक न्याय विभागाचा पैसा इतर वर्गाकडे वळवला जातो. तुम्ही तक्रार केली का? असा सवाल करत विधान परिषदेत एकनाथ खडसे आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. आदिवासी सामाजिक न्याय विभागाची स्वतंत्रता आणि स्वायत्तता संपली आहे. ११ टक्के मागास आणि ८ टक्के आदिवासी विभागाला पैसा दिला जातो. पण त्यात त्यांना मिळते काय? असा सवालही खडसेंनी केला. अनुसूचित आयोगाच्या चर्चेदरम्यान खडसे बोलत होते.

आदिवासी विभागाचे स्वतंत्र बजेट असायचे आता जनरलमध्ये केले जाते. पैसे किती कापले? असा सवाल खडसेंनी केला. लाडकी बहिणीला पैसे फिरवले. आधी योजना आणल्यावर पैशाची तरतूद व्हायची. आदिवासी विभागाचा ६५ वर्षात काहीच विकास झाला नाही असे खडसे म्हणाले. पिण्याच्या पाण्यासाठी नाल्याकडे जावे लागते. कुठे गेल्या तुमच्या योजना? सामाजिक न्याय मंत्रीच म्हणाले तुम्ही मांडा, मी सरकारी पक्षात आहे असेही खडसे म्हणाले. जीडीपी खूप वाढला म्हणता. आमचा पहिला क्रमाक म्हणता. समृध्दी, शक्तिपीठ काढा. पण आदिवासींना काहीतरी द्या असे खडसे म्हणाले.

## लक्ष्मण हाकेंची हालत भटक्या कुत्र्यासारखी करु; राष्ट्रवादी काँग्रेसचा इशारा

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- दोन समाजात तेढ निर्माण व्हावी, म्हणून जाणीवपूर्वक लक्ष्मण हाके स्टंटबाजी करत आहेत. राष्ट्रावदी युवक काँग्रेस त्यांची चड्डी पिवळी केल्याशिवाय राहणार नसल्याची टीका राष्ट्रवादी युवकचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी केली. पुढील आठ दिवसात लक्ष्मण हाकेची चड्डी पिवळी करण्याची जबाबदारी राष्ट्रवादीची आहे. लक्ष्मण हाकेंची हालत भटक्या कुत्र्यासारखी करु असा इशाराही चव्हाण यांनी दिला आहे.

लक्ष्मण हाकेला महाराष्ट्रात फिरु देणार नसल्याचा इशारा देखील सुरज चव्हाण यांनी दिला आहे. हाकेंची हालत भटक्या कुत्र्यासारखी करु असे चव्हाण म्हणाले. लक्ष्मण हाके यांच्यावर प्रतिक्रिया देताना सुरज चव्हाण यांची जीभ घसरल्याचे पाहायला मिळाले.

लक्ष्मण हाके यांनी अजित पवार यांच्यावर चुकीच्या शब्दात टीका केली होती. त्यांच्या या टीकेचा सुरज चव्हाण यांनी समाचार घेतला. लक्ष्मण हाके जाणीपूर्वक दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. अजित पवार यांच्यावर बोलण्याची लक्ष्मण हाके यांची लायकी नाही. तुम्हाला योग्य जागा दाखवण्याची आमची जबाबदारी असल्याचे सुरज चव्हाण म्हणाले. लक्ष्मण हाकेंना माझं खुलं आव्हान आहे की, पुढच्या १० दिवसात त्यांनी महाराष्ट्रात खुलं फिरुन दाखवावं असे सुरज चव्हाण म्हणाले. हाकेला जशाच तसं उत्तर देऊ. भटक्या कुत्र्याचा कसा उपचार करायचा याची माहिती आम्हाला आहे. प्रसिद्धीसाठी बोलणाऱ्या भटक्यांना त्यांची जागा दाखवली जाईल असेही सुरज चव्हाण म्हणाले.

# नारीशक्तीची डिजिटल भरारी; प्रगतीची नवी व्याख्या

**पूर्वी** डिजिटल साक्षरता मोठ्या शहरांपर्यंतच मर्यादित होती, मात्र तिची व्याप्ती कमी होती आणि ग्रामीण महिलांसाठी तर तंत्रज्ञान नावाची एखादी गोष्टच अस्तित्वात नव्हती. मात्र डिजिटल इंडिया मिशनअंतर्गत सुरू केलेल्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे हे चित्र पूर्णपणे बदलले आहे. विशेषतः २०१७ मध्ये प्रधानमंत्री ग्रामीण डिजिटल साक्षरता अभियान या योजनेने कोट्यवधी ग्रामीण महिलांना डिजिटल स्वरूपात सक्षम केले आहे. आता त्या स्मार्टफोन, इंटरनेट आणि डिजिटल साधनांच्या माध्यमातून सरकारी योजना, बँकिंग सेवा, टेलिमेडिसिन आणि इतर सुविधांचा थेट लाभ घेत आहेत. या अभियानांतर्गत ६ कोटींहून अधिक लोकांना प्रशिक्षित करण्यात आले आहे,

२०१४ मध्ये सुरू झालेली प्रधानमंत्री जन धन योजना, जी जनधन, आधार, मोबाईल यांच्या त्रिसूत्री सोबत मिळून जगातील सर्वात मोठा आर्थिक समावेशन कार्यक्रम बनली आहे. तिने भारतात आर्थिक सक्षमीकरणाची नवी गाथा लिहिली आहे. पूर्वी जिथे कोट्यवधी महिलांकडे बँक खाती सुद्धा नव्हती आणि सरकारी लाभाचे पैसे मध्यस्थांच्या हातात जात होते, तिथे आता जनधन, आधार आणि मोबाईलच्या त्रिसूत्रीने आर्थिक समावेशनाला एक नवी दिशा दिली आहे. या डिजिटल क्रांतीमुळे महिला थेट लाभ हस्तांतरण प्रक्रियेद्वारे थेट त्यांच्या बँक खात्यांमध्ये सरकारी योजनांचा लाभ मिळवत आहे.

तंत्रज्ञान-आधारित मंचांनी शिक्षण आणि रोजगाराच्या क्षेत्रात महत्त्वाचे बदल घडवले आहेत. स्किल इंडिया मिशन आणि ई-स्किल इंडियासारख्या कार्यक्रमांमुळे लाखो मुलींना आणि महिलांना आता त्यांच्या मोबाईलवर प्रशिक्षण मिळत आहे. यामुळे त्या उत्तम कौशल्ये शिकून स्वावलंबी बनत आहेत आणि रोजगाराच्या नवीन संधी प्राप्त करू शकत आहेत. हा बदल पूर्वीची मर्यादित संसाधने आणि पोहोच यापेक्षा खूपच जास्त व्यापक आणि सशक्त आहे. डथअधअच आणि ऊखघडकअ सारख्या पोर्टल्सनी महिलांना शिक्षणाशी जोडण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे, विशेषतः कोरोना महामारीच्या काळात जेव्हा संपूर्ण जग थांबल्यासारखे झाले होते. आता महिला आणि बाल विकास मंत्रालय आणि कौशल्य विकास मंत्रालय यांच्या संयुक्त उपक्रमांतर्गत १९ राज्यांमधील २७ जिल्ह्यांमध्ये किशोरवयीन मुलींना डिजिटल साक्षरतेसोबतच रोजगारभिमुख प्रशिक्षण दिले जात आहे.

एक काळ होता, ज्यावेळी महिलांचे लहान व्यवसाय घराच्या चार भिंतींपुरतेच मर्यादित होते आणि बाजारापर्यंत पोहोचणे हे एक मोठे आव्हान होते. पण, गेल्या काही वर्षांत महिलाप्रणीत स्टार्टअप्स आणि लघू उद्योगांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. सोशल मीडिया, डिजिटल मार्केटिंग आणि ऑनलाइन पेमेंट प्रणालीने त्यांना एक उद्योजक म्हणून पुढे जाण्याचा आणि स्वतःचा ब्रँड तयार करण्याचा आत्मविश्वास दिला आहे.

POSHAN ट्रॅकर, RCH पोर्टल आणि eSanjeevani यांसारख्या डिजिटल साधनांनी माता आणि मुलांशी संबंधित आरोग्य सेवांच्या देखरेखीला अत्यंत सोपे आणि प्रभावी बनवले आहे. आता अंगणवाडी सेविका आणि आशा भगिनी मोबाईल ॲप्सच्या मदतीने लाभार्थींची देखरेख, अहवाल देणे आणि सेवा वितरणाचे काम सहजपणे करू शकत आहेत. मोदी सरकारने ERSS-112, पॅनिक बटण आणि महिला सुरक्षा ॲप्स यांसारख्या प्रभावी उपायांची अंमलबजावणी केली आहे, ज्यामुळे आता महिला सार्वजनिक ठिकाणी स्वतःला पूर्वीपेक्षा अधिक सुरक्षित मानत आहेत.

विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित यामध्ये महिलांची भागीदारी विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित यांसारख्या क्षेत्रांमध्ये मुलींचा सहभाग एकेकाळी मर्यादित मानला जात होता, पण आता परिस्थिती वेगाने बदलत आहे. विज्ञान ज्योती आणि थखडए-घखठअछ योजनांसारखे उपक्रम विद्यार्थिनींना STEM क्षेत्रांमध्ये आगेकूच करण्यासाठी प्रेरित करत आहेत. भारतीय महिला आता अंतराळ संशोधन, कृत्रिम प्रज्ञा आणि जैवतंत्रज्ञानासारख्या क्षेत्रांमध्ये अग्रगण्य भूमिका बजावत आहेत.

पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली गेल्या ११ वर्षांत, डिजिटल तंत्रज्ञानाने महिलांच्या जीवनात अभूतपूर्व क्रांती घडवून आणली आहे. २०१४ पासून आतापर्यंत, सर्वसमावेशक धोरणे, सुनियोजित प्रशिक्षण आणि तंत्रज्ञानाच्या सुलभतेमुळे लाखो महिलांना आत्मनिर्भरतेच्या मार्गावर आणले आहे. अमृत काळाच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या भारतात, हे परिवर्तन महिलांना केवळ विकासातील भागीदारच नव्हे, तर या विकास यात्रेच्या नेत्या बनवत आहे. एक डिजिटली सक्षम महिला आज केवळ लाभार्थी नाही, तर विकसित भारताची निर्माती आहे.

२०१४ मध्ये, ज्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली देशात एका निर्णायक बदलाची सुरुवात झाली, तेव्हापासून भारताने डिजिटल प्रगतीची एक नवीन दिशा निश्चित केली. या ११ वर्षांत 'डिजिटल इंडिया मिशन' सारख्या लोक-केंद्रित मोहिमांनी कोट्यवधी नागरिकांच्या जीवनावर प्रभाव टाकला आहे.

विशेषतः महिलांसाठी हे परिवर्तन आत्मनिर्भरता, सक्षमीकरण आणि सन्मानाच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल ठरले आहे. आजच्या २१व्या शतकात तंत्रज्ञान केवळ प्रशासन आणि अर्थव्यवस्थेमध्येच नाही, तर सामाजिक रचनेतही बदल घडवत आहे आणि या बदलाचे सर्वात सशक्त उदाहरण म्हणजे त्या महिला आहे. ज्या डिजिटल युगात नवीन संधींसह नवी भरारी घेत आहे.

# शक्तिपीठ महामार्गास शेतकऱ्यांचा विरोध का... तुम्ही आम्ही गप्प का ?

**नागपूर** ते गोवा हा शक्तिपीठ महामार्ग करण्याचे सरकारने आयोजिले आहे. या महामार्गाला शेतकऱ्यांचा विरोध का? याची स्पष्टता होणे आवश्यक आहे. महामार्गासाठी कवडीमोल दराने शेतकऱ्यांच्या जमिनी घेतात हा मुद्दा गौण आहे. सध्याच्या कायद्यानुसार महामार्ग किंवा रेल्वे मार्ग करण्यासाठी तसेच धरणांसाठी जमिनी घेताना कायद्यानुसार नुकसान भरपाई दिली जाते किंवा पुनर्वसन केले जाते. याविषयी वाद असण्याचे काही कारण नाही.

१) नागपूर ते रत्नागिरी हा महामार्ग झाला तेव्हा शेतकऱ्यांनी विरोध केला नाही. काही ठिकाणी शेतीचा मोबदला देण्याविषयी वाद होते ते त्या त्या ठिकाणी तेवढे संपले.

२) महाराष्ट्रात कोणताही महामार्ग करण्यासाठी शेतकऱ्यांचा विरोध नाही.

३) सोलापूर - पुणे महामार्ग करण्यात आला त्याला विरोध केला नाही.

४) आत्ता पुणे ते छत्रपती संभाजी नगर महामार्ग करण्यात येणार आहे. त्याला विरोध झाला नाही.

५) समृद्धी महामार्गासाठी शेतकऱ्यांनी विरोध केला नाही.

६) पुणे नाशिक चार पदरी रस्ता गेले कित्येक वर्षे करीत आहेत. त्याला शेतकऱ्यांनी विरोध केला नाही.

७) पुणे बेंगलोर ग्रीन कॉरिडॉर म्हणून नवा रस्ता करणार आहेत त्याला शेतकऱ्यांचा विरोध नाही

८) मुंबई गोवा महामार्ग क्रमांक १७ केला जात आहे त्याला कुठे शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. शक्तिपीठ महामार्गाला विरोध याच्यासाठी आहे की नागपूर ते कोल्हापूरपर्यंत एक महामार्ग झाला असताना याच महामार्गाला समांतर असा दुसरा महामार्ग करण्याची गरज आहे का? एवढाच प्रश्न आहे आणि या महामार्गासाठी ८६ हजार कोटी रुपये खर्च केल्यानंतर ते पैसे पुढील ५० वर्ष लोकांनी भरायचे आहेत. वास्तविक हा प्रश्न शेतकऱ्यांचा नाहीच. शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला मिळणार आहे. तो घेऊन ते रिकामे होऊ शकतात. पण खरंतर लोकांच्यावर ८६ हजार कोटीचा व्याजासह भ्रुदंडदंड बसविला जाणार आहे. ज्या मार्गावरून लोक ये जा करणार आहेत. त्या मार्गावर जाण्यासाठी किंवा त्या जिल्ह्यामध्ये जाण्यासाठी नागपूर रत्नागिरी महामार्ग आहे. कोल्हापूर ते रत्नागिरीला जाता येऊ शकतं आणि कोल्हापूर वरून गोव्याला जाण्यासाठी अनेक मार्ग आहेत त्यामुळे या महामार्गाची गरज नसताना करण्याचा अट्टाहास कशासाठी..? तो पूर्ण झाल्यानंतर जवळपास दहापट किंबहुना कायमचा परतावा टोलरुपी कर लोकांना द्यावा लागणार आहे. लोकांच्या डोक्यावर ८६ हजार कोटी रुपये कायमचे ओझे कशासाठी ठेवता .....? कारण ज्या शक्तिपीठांसाठी हा महामार्ग केला जात आहे. त्या मार्गावर त्या शक्तिपीठांना




जाण्यासाठी आत्ता रस्ते आहेत. कुठेही अडचण नाही. ही बाजू का समजून घेतली जात नाही.

शक्तिपीठ महापार्गाचा सर्वात मोठा फटका कृष्णा खोऱ्यातील सर्व नद्यांच्यावर बांधण्यात येणारे पूल आणि रस्ते याच्यामुळे तासगाव, पलूस, मिरज, वाळवा, शिराळा, शिरोळ, हातकणंगले. पन्हाळा, करवीर, कागल, भुदरगड, राधानगरी आणि बेळगाव जिल्ह्यातील चिकोडी आणि निपाणीया सर्व तालुक्यांमध्ये महापुराचा धोका वाढणार आहे. या भागातील शेती महाराष्ट्रातील साखर कारखानदारी आणि दुग्ध व्यवसायावर अवलंबून आहे त्यामुळे या तालुक्यांचा संबंध महाराष्ट्राशीच आहे. सांगली, इचलकरंजी, कुरुंदवाड, कागल आणि कोल्हापूर आदी शहरांना आता महापुराचा तडाखा बसतोच. ही सर्व शहरे या रस्त्याच्यामुळे पूर्णता धोक्यात येतील. कारण हा मार्ग पद्माळेपासून कृष्णा नदीवरून जाणार आहे. पुढे दानोळीला जात असताना वारणा नदीवरून जाणार आहे. त्याच्यापुढे रुकडी जवळून पंचगंगा नदीवरून जाणार आहे. कागल तालुक्यात दूधगंगा आणि वेदगंगा नदीवरून जाणार आहे. भुदरगड तालुक्यात पुन्हा तो वेदगंगा नदीवरून जाईल. या सर्व नद्यांच्या वरून जाताना किमान १५ ते २० फुट रस्त्याची भर पडेल आणि हा सर्व परिसर महापूर प्रवण क्षेत्र म्हणून आज धोक्यात आहे. या रस्त्याच्या बाजूने असलेली शेती पाणी साचून खराब होणार आहे.

जर हा महामार्ग करायचाच असेल तर सरकारने टोलमुक्त किंवा टोल न लावता हा रस्ता करून दाखवावा. या रस्त्यासाठी एक रुपयाही टोल घेणार नाही हे जाहीर करावे. महापूर क्षेत्रांमध्ये हा रस्ता पिलर पूल वरून बांधावा.

नागपूर ते कोल्हापूरपर्यंत उत्तम महामार्ग झालेला आहे. सांगली जिल्ह्यातील अंकली ते कोल्हापूर जिल्ह्यातील चोकाक इतकाच रस्ता करायचा बाकी आहे. हा रस्ता करावा आणि या रस्त्यावरून नागपूरहून येणाऱ्या लोकांना कोल्हापूर मार्गे गोव्याकडे जाण्यासाठी चार-पाच मार्गाने जाता येते. कोकणात उतरल्याबरोबर मुंबई - गोवा महामार्ग तयार झालेला आहे. त्यावरून पुढे जाता येते. हा शक्तिपीठ महामार्ग गरज नसताना ८६ हजार कोटी रुपये खर्च करून लोकांच्यावर कर्ज का लादत आहात.? कारण याचा जो खर्च होईल आणि वाढेल, जे व्याज होईल ते सर्व लोकांनी द्यायचे आहे. लोकांच्यावर कर्ज किंवा बोजा टाकण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला? तो बोजा आम्ही सहन करणार नाही असे म्हणण्याचा अधिकार लोकांना नाही का?

**पर्याय** - महाराष्ट्र जलसिंचन महामंडळ स्थापन करा आणि ८६ हजार कोटी रुपये त्याला उपलब्ध करून देऊन पश्चिम घाटामध्ये (सह्याद्री पर्वत रांगा) जी धरणे आहेत. त्यामध्ये भरपूर पाणी शिल्लक राहते. ते सर्व पाणी मराठवाड्याला घेऊन जा. ८६ हजार कोटी रुपये उभे करून विदर्भातील १३१ जलसिंचन प्रकल्प अर्धवट अवस्थेत आहेत. किंबहुना काही जलसिंचन प्रकल्पाची कामे सुरू पण झालेली नाहीत. ती तातडीने पाच वर्षात पूर्ण करा. ती पूर्ण केली तर विदर्भातील १४ लाख हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे. इतकी जमीन जर ओलिताखाली आली, तर संपूर्ण देशाला कापड पुरवण्याचं काम विदर्भ करू शकेल. इतक्या मोठ्या प्रमाणात विदर्भात कापूस उत्पादन होईल. त्या कापसावर प्रक्रिया करणारे उद्योग धंदे विदर्भात उभे करा. विदर्भाला स्वतंत्र राज्याचा दर्जा द्या अशी काही चांगली काम करण्यासाठी पाऊले उचला. लोकांच्यावर बोजा टाकून राज्यकारभार करणारे कसले राज्यकर्ते...?

लोकांच्यावर बोजा टाकण्याऐवजी लोकांचे उत्पन्न वाढेल आणि राज्याचा कर वाढेल, राज्याचे दरडोई उत्पन्न वाढेल, याच्यासाठी गुंतवणूक करा. खरे तर हा प्रश्न शेतकऱ्यांचा नाहीच हा तुम्हा आम्हा सर्व लोकांचा आहे कारण आपल्या गाड्या धावणार आहेत आणि आपल्याकडून पैसे वसूल करणार आहेत शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीचा मोबदला मिळाला तर त्यांचा प्रश्न मिटला उलट आपण या विरुद्ध लढले पाहिजे पण आपण शहरी लोक विकासाच्या गप्पा मारत बसलेलो आहोत याला विकास म्हणत नाहीत याला विनाश म्हणतात.

वारणा नदीवर चांदोली येथे ११०० कोटी रुपये खर्च करून बांधलेले धरण..! त्या धरणाच्या पाण्यावर आज दहा हजार कोटीचे शेती उत्पादन होते आहे. एक वेळ गुंतवणूक (वन टाइम इन्वेस्टमेंट ) अकराशे कोटी रुपये केल्यानंतर दरवर्षी दहा हजार कोटी रुपयांचे उत्पादन वाढले आहे. जरा अर्थशास्त्राचा विचार करून राज्यकारभार करावा. अशा राज्यकर्त्यांना आपण निवडून दिलेले असल्यामुळे आपणास हे भोगावे लागते आहे ही चूक खरंतर जनतेचीच आहे.

या कामाचे कंत्राट कोणातरी केंद्रातल्या मोठ्या भेंड्याच्या नातेवाईकाला द्यायचे आहे अशी एक कुजबुज ऐकायला मिळते अजून कंत्राट निघालेले नसल्यामुळे नावे समजत नाहीत पण कोणीतरी मंत्री आणि त्याचा मुलगा असल्याचे समजते.

**- वसंत भोसले**
ज्येष्ठ संपादक
कोल्हापूर / सांगली.

# स्वामी विवेकानंद जगाच्या पाठीवरील तेजस्वी युगपुरुष

## स्वामी विवेकानंद पुण्यतिथी



स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी कोलकाता येथे झाला.स्वामी विवेकानंद यांची आवड आणि अभ्यास प्रगल्भ होता.त्यांना संगीत, साहित्य आणि तत्वज्ञान यात विशेष रस होता.याव्यतीरीक्त पोहणे, घोडेस्वारी व कुस्ती हे त्यांचे आवडते छंद होते. वयाच्या २५ व्या वर्षी स्वामीजींनी वेद,पुराण, बायबल, कुराण,धम्मपद,तनाख, गुरू ग्रंथ साहिब, दास कॅपिटल, भांडवलशाही, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र या सर्वच विचारधारा अवगत केलेल्या होत्या.म्हणजे त्यांना इतर सर्व ज्ञान तर होतेच परंतु जगातील संपूर्ण धर्माचा अभ्यास त्यांनी अवगत केलेला होता.यावरून असे वाटते की स्वामी विवेकानंदांना संपूर्ण ब्रम्हांडाचे ज्ञान असल्याचे दिसून येते. याला दैवी शक्तीच म्हणावे लागेल.कालांतराने रामकृष्ण परमहंस यांच्या आश्रयाला गेले व रामकृष्ण परमहंस यांच्या रहस्यमय व्यक्तीतत्वाने ते अत्यंत प्रभावीत झाले आणि त्यांचे संपूर्ण जीवन बदलले.स्वामींनी १८८१ मध्ये रामकृष्ण परमहंस यांना आपले गुरू केले.१८८६ मध्ये रामकृष्ण परमहंस यांच्या मृत्यूनंतर स्वामी विवेकानंदांच्या कार्याला एक नवीन वळण आले.वयाच्या २५ व्या वर्षी त्यांनी भगवे वस्त्र धारण केले व संपूर्ण भारतभर पायी प्रवास सुरू केला.देशातील गरीबी आणि सामाजिक दुष्टांची अवस्था पाहून त्यांची मनस्थिती दु:खावली गेली.काही दिवसांतच शिकागो येथे जगातील धर्म परिषद होणार असल्याची माहिती मिळाली.११ सप्टेंबर १८९३ ला शिकागो येथे जगातील धर्म परिषद भरली.भारताचे प्रतिनिधी म्हणून स्वामी विवेकानंद तेथे पोहोचले.तिथे अनेकांनी खूप प्रयत्न केले की स्वामी विवेकानंद यांना बोलायला वेळ मिळुन नये.परंतु एका अमेरिकन प्राध्यापकाच्या प्रयत्नाने त्यांना बोलायला थोडा वेळ मिळाला. त्यानी जागतिक धर्म परिषदेतील धर्म संसदेतील भाषणाची सुरुवात 'बंधु व भगिनी'असे करून केली. यानंतर त्यांच्या भाषणाचे विचार ऐकून संपूर्ण धर्म परिषद स्तब्ध झाली व टाळ्यांचा कडकडाट झाला जनुकाय आकाशवाणी झाली की काय! आणि स्वामी विवेकानंद जगप्रसिद्ध झाले व त्यांचे अमेरिकेत जोरदार स्वागत झाले. युगानुयुगे आपल्या तेजस्वी विचारांची ज्योत संपूर्ण जगात सकारात्मक व शांती प्रदान करणारी रहावी या उद्देशाने स्वामी विवेकानंद यांनी आपले कार्य पुढे सुरूच ठेवले. एकतेचा संदेश जगाला देऊन सर्व मानवजातीला बंधुतेचा, मानवतेचा संदेश देणारे व सुखशांती निर्माण करणारे कार्य स्वामी विवेकानंद यांनी केले.त्यांनी जगाचा इतिहास आणि पाश्चात तत्वज्ञानांचा अभ्यास महाविद्यालयीन जीवनातच केला. अनेक धर्माच्या तात्विक अभ्यासामुळे त्यांनी अमेरिकेतील शिकागो येथे भरलेल्या सर्वधर्म परिषदेत हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व त्यांनी केले. ११ सप्टेंबर १८९३ या दिवशीच्या त्यांच्या भाषणाने संपूर्ण सभा प्रभावित झाली व १७ दिवसाच्या या परिषदेत हिंदुस्थानातील प्रभाव दिसून आला. मुलांचा सर्वांगीण विकास व त्यांच्या कौशल्यांचा विकास व्हावा, मुले आत्मनिर्भर व्हावी असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यांच्या या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता आजच्या युवा पिढींनी अवगत करायला हवी. मूलांचा शारीरिक, मानसिक आणि अध्यात्मिक विकास होऊन मन,बुद्धी विकसित करणारे, स्वावलंबी, चारित्र्यसंपन्न ओळख निर्माण करणारे शिक्षण असावे असे त्यांचे मत होते. भारताच्या आध्यात्मिक संस्कृतीबद्दल गाड अभिमान असला, तरी त्यात शिरलेल्या अनिष्ट रुढी, परंपरा, जातीभेद यांसारख्या हीन गोष्टींवर त्यांनी भाषणांतून कडाडून हल्ला चढवला. निराकार समाधीत मन रहाण्याची स्वत:ची स्वाभाविक प्रवृत्ती बाजूला सारून त्यांनी सर्वसामान्य लोकांच्या सुखदुःखाचा योग्य पातळीवरही विचार केला आणि त्यांच्यासाठी झटले व सर्वस्वाचे समर्पण म्हणजेच खरा संन्यास' हे वचन सार्थ केले. स्वामी विवेकानंद हे सर्व तरुणांचे आजही प्रेरणास्थान आहेत. अशा या महान तत्त्वज्ञानी महापुरुषाला माझा सलाम.आज देशात आपल्याला जी काही एकता आणि बंधुता दिसून येत आहे त्याचे संपूर्ण श्रेय स्वामी विवेकानंदांना जाते.१८९९ साली स्वामीजींनी पुन्हा पश्चिमेकडे प्रवेश केला आणि भारतीय संस्कृतीचा, अध्यात्मचा संदेश प्रसारित केला.अशाप्रकारे परदेशातही त्यांनी भारताची भूमिका मांडण्याचे काम त्यांनी केले.असा तेजस्वी महापुरुष भारत भुमिला लाभला हे भारतीयांचे अहोभाग्यच आहे.आजही आपला देश स्वामी विवेकानंदांच्या विचारधारेवर चालतो ही भारतीयांसाठी स्वाभिमानाची बाब आहे. परंतु अचानक ४ जुलै १९०२ ला ३९ व्या वर्षी स्वामींची प्राणज्योत मालवली व भारतासह जगातील अनेक राष्ट्रांना धक्का बसला.कारण स्वामी अल्प वयात आपल्याला सोडून गेले आणि ज्ञानाची तेजस्वी जोत मावळली.अशा महापुरुषांनी पुन्हा-पुन्हा जन्म घ्यावा असे आज सर्वांनाच वाटते.त्यामुळे आजही स्वामीजींची आस्था सर्वांच्या हृदयात घर करून आहे.मी संपूर्ण भारतवासीयांना विनंती करतो की स्वामी विवेकानंदांचे विचार अवश्य अवगत करावे. आपणा सर्वांचाच मार्ग सुखरूप व मोकळा होईल.जोपर्यंत सुर्य,चंद्र,तारे,आकाश-पाताळ,ग्रह-तारे आहेत तोपर्यंत स्वामीजींचे विचार सर्वांच्याच हृदयात राहिल.

स्वामी विवेकानंद यांच्या पुण्यतिथी निमित्त सरकारने, सामाजिक संघटना, शाळा-महाविद्यायासह संपूर्ण युवावर्गानी आजच्या दिवशी वृक्षलागवड केली पाहिजे.यामुळे गुरांना चारा व संपूर्ण मानव जातीला आणि प्राणीमात्रांना शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.यामुळे अनेकांचे प्राण आपल्याला वाचविता येईल व प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात,फळात व जळामुळात आपल्याला स्वामींचे दर्शन अवश्य होईल. स्वामीच्या पुण्यतिथी निमित्त कोटी कोटी प्रणाम. जय हिंद!

**- रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर

# वीज दर स्वस्त नसुन शॉक आहे

**राज्यातील** वीज ग्राहकांसाठी वीज दर ठरविण्यासाठी महावितरणने दाखल केलेल्या याचिकेवर महाराष्ट्र नियामक आयोगाने निर्णय दिला असून घरगुती-औद्योगिक अशा सर्व ग्राहकांच्या वीजदरात आगामी पाचही वर्षात कपात करण्याचा आदेश दिला आहे. स्मार्ट मीटर असलेल्या घरगुती ग्राहकांना दिवसा वीज वापरासाठी १० टक्के अतिरिक्त टीओडी सवलत आणि सौर ऊर्जा निर्मिती करणाऱ्या घरगुती ग्राहकांना प्रोत्साहन याचे स्वागतच.गरीब व सर्वसामान्य ग्राहक घरगुती युनिटचा वापर साधारणतः १०० ते ३०० युनिट पर्यंत होतोच आणि सरकारने ग्राहकांना फक्त १ ते १०० युनिट पर्यंत ५.७४ प्रति युनिट असा दिलासा दिला आहे हे तर असे झाले की 'उंट के मु मे जीरा' त्यामुळे वीज ग्राहकांना दिलासा किंवा स्वस्त म्हणता येणार नसुन याला जोर का झटका म्हणावा लागेल. आज राज्यात १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणाऱ्यांचे ७० टक्के सांगितले जात आहे.परंतु माझ्या माहितीनुसार १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणाऱ्यांचे प्रमाण साधारणतः ३० टक्के पेक्षा कमी असावेत आणि शंभरच्या वर म्हणजे १०० ते ३०० युनिट पर्यंत वापरणाऱ्यांचे प्रमाण ५० टक्के पेक्षा जास्त असावेत कारण यात गरीब व सर्वसाधारण किंवा कामगार वर्ग मोडतो. त्यामुळे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वीजेचे जे युनिट दर आणि युनिटची आकडेवारी दिली आहे त्यात बदल करणे गरजेचे आहे.विद्युत नियामक आयोगाने जे १ ते १०० पर्यंत युनिटचे दर ५.७४ लावले आहेत ते दर १ ते ३०० युनिट पर्यंत लावायला पाहिजे होते तेव्हा ग्राहकांना दिलासा मिळेल. कारण साधारणतः १०० युनिटच्या वर सर्वांचाच वापर होतो. करीता वीज दरात ग्राहकांना सरसकट दिलासा हा दिखावा असुन महावितरणने व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिलेला मोठा शॉक आहे.महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मितीच्या बाबतीत अव्वल आहे.परंतु इतर राज्यांच्या बरोबरीचा विचार केला तर वीज दर इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रांतील दर जास्त व महागडे आहे ही वीज निर्मिती करणाऱ्या राज्याच्या दृष्टीकोनातून चिंताजनक बाब म्हणावी लागेल.त्यामुळे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने आखुण दिलेले वीज दर सर्वसामान्यांना परवडणारे नसल्याने यात बदल करून १ ते ३०० पर्यंत युनिट वीज वापरणाऱ्या ग्राहकांना ५.७४ प्रति युनिट दर लावावा जेणेकरून याचा फायदा गरीब व सर्वसामान्यांना सहज होईल.कारण वाढती महागाई, वीजेचे बिल,घर टॅक्स,पाणी बील,औषधोपचाराचा खर्च इत्यादी अनेक बाबी अल्पशा उत्पन्नात पुर्ण होवू शकत नाही त्यामुळे आपली स्वतःची वीज निर्मिती असल्याने यात गरीब व सर्वसामान्यांना कशा पद्धतीने लाभ देता येईल यावर सरकारने,महावितरणने व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने गांभीर्याने विचार करावा व ग्राहकांना दिलासा द्यावा हीच अपेक्षा.

**- रमेश कृष्णराव लांजेवार**



वैजापूर – येथील सामाजिक कार्यकर्ते व जेष्ठ नागरिक ठाकूर धोंडीरामसिंह राजपूत यांच्या वाढ दिवस निमित्त भारत सरकारचे माजी अर्थराज्यमंत्री ना,डॉ.भागवत कराड यांनी राजपूत यांच्या वाढदिवसा निमित्त त्यांचे विशेष अभिनंदन केले. या प्रसंगी देवगिरी बँकेचे चेअरमन किशोर जी शितोळे,मोहन आहेर, दशरथ बनकर, प्रशांत कंगले, दामोदर पारीख, गौरव दौडे ज्ञानेश्वर आदमाने, संदीप ठोंबरे, गोकुळ भुजबळ यांनीही राजपूत यांचे अभिष्टचिंतन केले.

# जालना ते तिरुपती विशेष गाडीमध्ये दोन डब्यांची वाढ

छत्रपती संभाजीनगर, दि.३ (प्रतिनिधी) – दक्षिण मध्य रेल्वे ने नांदेड विभागातून गाडी क्रमांक ०७६०९-०७६१० जालना – तिरुपती – जालना दरम्यान विशेष गाड्या चालवीत आहे. प्रवाशांचा प्रतिसाद पाहून दक्षिण मध्य रेल्वे ने या विशेष गाडी मध्ये तृतीय श्रेणी वातानुकुलीत श्रेणी चे दोन डब्बे कायम स्वरूपी वाढविण्याचे ठरविले आहे. हे दोन डब्बे दिनांक ७ जुलै पासून जालना येथून सुटणाऱ्या गाडीत आणि दिनांक ८ जुलै पासून तिरुपती येथून सुटणाऱ्या गाडीत जोडण्यात येणार आहेत. या वाढीनंतर या गाडीतील डब्यांची एकूण संख्या २१ झाली आहे.

# गोसेवा आयोगाच्या नोंदणीकृत गाईच्या पालन पोषण अनुदान योजनेसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

छत्रपती संभाजीनगर, दि.३ (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील गोसेवा आयोगाकडील नोंदणीकृत देशी गायीच्या पालन पोषणासाठी प्रति दिन प्रति पशु ५० रुपये अनुदान योजने अंतर्गत अर्ज करण्यास १० जुलै पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे,

असे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी कळिवले आहे. नोंदणसाठी htt://schemes.mahagosevaayog.org या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावयाचा आहे. जिल्ह्यातील पात्र गोशाळा, गोसदन पांजरपोळ व गोरक्षण संस्थानी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी दि.१ ते १० जुलै या कालावधीत अर्ज करण्यास द्वितीय मुदतवाढ देण्यात आली आहे.

गोसेवा आयोगामार्फत प्राप्त अर्जाची प्राथमिक तपासणी दि.११ ते १७ जुलै, जिल्हा गोशाळा पडताळणी समिती द्वारा प्राथमिक तपासणीअंती पात्र गोशाळांची प्रत्यक्ष भेट व पडताळणी दि.१८ जुलै ते १८ ऑगस्ट पर्यंत, जिल्हा गोशाळा पडताळणी समिती अहवालानुसार अनुदानास पात्र गोधनाची संख्या आयोग कार्यालयास कळिवणे दि.१९ ऑगस्ट ते २४ ऑगस्ट असे वेळापत्रक आहे,असे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी कळवले आहे.

# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मार्फत बांधकाम कामगारांना गृहउपयोगी वस्तू संच निशुल्क वाटप

छत्रपती संभाजीनगर, दि.३ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र इमातर व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाअंतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांचे लाभवाटप करण्यात येते. सर्व कामकाज हे www.mahabocw.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन प्रणालीद्वारे निशुल्क करण्यात येते.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून नोंदीत जिवीत, सक्रीय कामगारांना मे.मफतलाल इंडस्ट्रीज लि. मुंबई या संस्थेच्या वितरण केंद्रावर गृहपयोगी संचाचे वाटप करण्यात येते. संच कुटुंबातील (पती / पत्नी) करीता एकच अनुज्ञेय राहणार आहे. गृहपयोगी संचाचे वाटप मंडळाच्या दि.३० जून २०२५ रोजीच्या आदेशान्वये निश्चित दिनांक भेट पद्धत Aoinment System नुसार होणार असून मंडळाच्या htt://hikit.mahabocw.in/aointment या संकेतस्थळाला भेट देऊन लाभार्थ्यांनी अपाईटमेंट घेऊन संच मिळवण्यासाठी संच वाटपाचा दिनांक व वितरण केंद्र याची निवड करावी. कामगाराने त्याने निवडलेल्या दिनांकास मंडाळोच ओळखपत्र अथवा आधार कार्ड व नियुक्ती पत्र घेऊन निवडलेल्या वितरण केंद्रावर उपस्थित राहिल्यानंतर ऑनलाईन प्रणाली प्रक्रियेनंतर कामगारांना प्रत्यक्ष संच ताब्यात देण्यात येईल.

वाटप पूर्णत : निशुल्क असून कोणत्याही एजंट, संघटना अथवा त्रयस्थ व्यक्ती यांच अमिषाला व दबावाला बळी पडू नये व त्यांचेशी कोणतेही आर्थिक व्यवहार करु नये. कोणत्याही व्यक्ती कडून नोंदणी, नुतनीकरण व लााभासाइी पैशाची मागणी केल्यास त्यांचे विरोधात जवळचे पोलीस स्टेशन व या कार्यालयास तक्रार दाखल करावी असे आवाहन सहायक कामगार आयुक्त ग.भा.बोरसे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळिवले आहे.

# तृतीय पंथीयांनाही एसटीत ५० टक्के सवलत

मुंबई : महिलांना एसटीच्या प्रवासात ५० टक्के सवलत दिल्यानंतर आता राज्यातील तृतीय पंथीयांनाही एसटीच्या प्रवासात ५० टक्के सवलत मिळणार आहे. तृतीय पंथीयांना एसटीत प्रवासात सवलत देण्यासाठी एसटी महामंडळाच्या बैठकीत प्रस्ताव मंजूर करण्यात येईल. त्यानंतर महिलांसह तृतीय पंथीयांनाही एसटीत ५० टक्के सवलतीत प्रवास करता येईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

परिवहन विभागाच्या या निर्णयामुळे २०११ च्या जनगणनेनुसार राज्यातील चार लाख तृतीय पंथीयांना दिलासा मिळणार आहे. कर्नाटकात महिलांसाठी असणारे मोफत बस प्रवास सेवा योजना यामध्ये तृतीयपंथी घटकांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळामार्फत राज्यातील महिलांना एसटी बस प्रवासात महिलांसाठी ५० टक्के सवलत देण्यात आली आहे. ही बाब अत्यंत स्वागतार्ह आहे. राज्यातील तृतीयपंथी घटकही आर्थिकदृष्ट्या कमकुवत असून समाजातील मुख्य प्रवाहाशी जोडले जाण्यासाठी आणि स्वावलंबी जीवन जगण्यासाठी प्रयत्नशील आहे. तृतीय पंथीयांनाही ५० टक्के सवलत देण्यात यावी, अशी मागणी परिवहन मंत्र्यांकडे केल्याचे तृतीयपंथी मंडळ उपाध्यक्ष सान्वी जेठवाणी यांनी सांगितले.

# पुरी येथील अथवा अन्य धार्मिक स्थळी चेंगराचेंगरीचे गालबोट चिंताजनक!

**ओडिशातील** पुरी येथील भगवान जगन्नाथ रथयात्रेच्या वेळेस रविवार दिनांक २९ जून २०२५ ला सकाळी पहाटे ४ वाजून ३० मिनिटांनी भावीक श्रीगुंडीचा मंदिराच्या सामोरं भगवान जगन्नाथ यांचे दर्शन करण्यासाठी भक्तगण मोठ्या संख्येने जमा झाले होते याच वेळेस अचानक धक्का-मुक्की झाली अशा परिस्थितीत लोकांना काहीच समजेनासे झाले व चेंगराचेंगरी झाली यात ६ भाविकांचा मृत्यू झाला तर ५० पेक्षा अधिक लोक गंभीररीत्या जखमी झालेत.भगवान जगन्नाथ रथयात्रेच्या दरम्यान लाखोच्या संख्येने भाविक येतात त्यामुळे अशा दुर्घटनांवर स्थानिक प्रशासन,राज्य सरकार व केंद्र सरकारने करडी नजर ठेवने गरजेचे आहे.अशाच प्रकारे मे महिन्यात गोव्यातील लैराईदेवी यात्रेमध्ये सहभागी होण्यासाठी गोवा,महाराष्ट्र आणि कर्नाटक येथुन दरवर्षी ७० ते ८० हजार भाविक याठिकाणी पोहचत असतात.परंतु दिनांक ३ मे २०२५ शनिवारला गोव्याच्या उत्तर भागात असलेले शिरगांव येथील श्री लैराईदेवी मंदिरात पहाटे ३ ते ४ च्या दरम्यान भाविकांमध्ये अचानक चेंगराचेंगरीची घटना घडली यात ६ लोकांचा मृत्यू झाला होता व ८० पेक्षा अधिक गंभीर जखमी झाले होते.वार्षिक उत्साहासाठी हजारो भाविक अरूंद गल्लयांमधुन मंदिरात येत असतांना ही भयावह घटना घडली.मंदिरातील उत्सवासाठी किमान ३० ते ४० हजार भाविक एकत्र जमले होते. यातील काही जण उतार असल्याने खाली पडले. त्यामुळे इतरही लोक एकमेकांच्या अंगावर कोसळल्याने भयावह चेंगराचेंगरीचा घटना झाली.दरवर्षी कुठे ना कुठे चेंगराचेंगरीच्या घटनांचा प्रकार दिसून येतो. यामुळे जीवितहानी सुध्दा होते.त्याची पुनरावृत्ती आपल्याला पुरीच्या रथयात्रे दरम्यान श्री गुंडीचा मंदिराजवळ दिसून आली.अशाच प्रकारची घटना आंध्रप्रदेशातील प्रसिद्ध तिरूपती बालाजी मंदिराजवळ वैकुंठ व्दार दर्शनाच्या टोकन वितरण केंद्रावर झालेल्या चेंगराचेंगरीत दिनांक ८ जानेवारी २०२५ ला ६ जणांचा मृत्यू झाला होता व ४० हुन अधिक गंभीर जखमी झाले होते.टोकन वितरण केंद्र सकाळी ५ वाजता उघडण्याचे नियोजन होते.यासाठी भाविक रांगा लावू लागले व प्रचंड गर्दी झाली होती.विविध केंद्रावर सुमारे ४००० हजारहून अधिक भाविक रांगेत उभे होते व चेंगराचेंगरीमुळे मोठा गोंधळ उडाला आणि त्यात एका महिलेचा प्रथम मृत्यू झाला व नंतर गंभीर जखमी झालेल्या ५ भाविकांचा मृत्यू झाला अशाप्रकारे ६ भाविकांना चेंगराचेंगरीत आपले प्राण गमवावे लागले.देशात



दरवर्षी अनेक ठिकाणी मंदिर परिसर, प्रवचन परिसर, किर्तन परिसर, गर्दीचे ठिकाण,रेल्वे स्टेशन किंवा अन्य ठिकाणी चेंगराचेंगरीचे प्रकार होतांना दिसतात व यामुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी सुध्दा झालेली आहे आणि याचे जिवंत उदाहरण आपल्याला ओडिशातील पुरी येथील भगवान जगन्नाथ रथयात्रेच्या दरम्यान श्री गुंडीचा मंदिर परिसरात दिसून आले. चेंगराचेंगरीचे प्रकार का होतात याला मुख्य जबाबदार कोण याचाही विचार आपण सर्वसामान्यांनी, मंदिर प्रशासनाने व स्थानिक प्रशासनाने केला पाहिजे.कारण भाविकांनी भीड करायची व मंदिर प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करायचे त्याचे प्रयचित्य भाविकांनी भोगायचे अशी परिस्थिती आज चेंगराचेंगरीच्या प्रकारात दिसून येते म्हणजेच 'आ बैल मुझे मुझे मार' अशी परिस्थिती झालेली आहे.भारतातील चेंगराचेंगरीच्या अनेक भयावह घटना झालेल्या आहेत यामध्ये ५ मार्च २०१० ला उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथील राम जानकी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६३ जणांचा मृत्यू झाला होता.भारतात बऱ्याच ठिकाणी अपुऱ्या आणि पायाभूत सुविधांच्या मर्यादांमुळे असुरक्षितता असते. अनेकदा दुर्गम ग्रामीण भागात, डोंगराळ प्रदेशात, टेकड्यांवर किंवा योग्य मार्ग नसलेल्या नदीकाठावर धार्मिक कार्यक्रमाचं आयोजन केले जाते. अशा ठिकाणी असलेला तीव्र उतार, स्थळाची असमान भूरचना, अरुंद मार्ग, एकाच ठिकाणी भाविक एकत्रित येणे या कारणांमुळे धार्मिक कार्यक्रमामध्ये मोठे धोके निर्माण होतात. त्यातून चेंगराचेंगरीच्या घटना घडतात.धार्मिक किंवा सामूहिक कार्यक्रम घेताना व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष करते व दुर्घटना उद्भवतात. इंटरनॅशनल जर्नल ऑफ डिझास्टर रिस्क रिडक्शननं (आयजेडीआरआर)ने प्रकाशित केलेल्या २०१३ च्या अभ्यासात असं दिसून आलं की, भारतातील ७९ टक्के चेंगराचेंगरीचे ठिकाणे हे धार्मिक मेळावे आणि तीर्थयात्रेची ठिकाणे आहेत. विकसित देशांमध्ये बहुतेक चेंगराचेंगरी स्टेडियम, संगीत मैफिली आणि नाईट क्लबच्या ठिकाणी होतात. परंतु भारत आणि इतर विकसनशील देशांमध्ये चेंगराचेंगरीच्या बहुतेक दुर्घटना धार्मिक स्थळांवर होतात,असे केरळ सरकारच्या भू आणि आपत्ती व्यवस्थापन संस्थेचे सहाय्यक प्राध्यापक फैसल टी. इलियास यांनी सांगितले. ४ जुलै २०२४ उत्तर प्रदेशातील हाथरस येथे एका धार्मिक कार्यक्रमात चेंगराचेंगरी होऊन किमान २७ जणांचा मृत्यू झाला,१७ फेब्रुवारी २०२४ उत्तर प्रदेशातील मथुरा येथील पूजनीय श्रीजी मंदिरात होळीपूर्वी झालेल्या कार्यक्रमादरम्यान चेंगराचेंगरीत किमान सहा भाविक बेशुद्ध पडले तर काही जण जखमी झाले,२४ डिसेंबर २०२३ मथुरा येथील बांके बिहारी मंदिरात गर्दीमुळे गुदमरून दोन महिला भाविकांचा मृत्यू झाला,१ जानेवारी २०२२ जम्मू आणि काश्मीरमधील प्रसिद्ध माता वैष्णोदेवी मंदिरात भाविकांच्या प्रचंड गर्दीमुळे झालेल्या चेंगराचेंगरीत १२ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले,२१ एप्रिल २०१९ तामिळनाडूच्या त्रिची येथील मंदिर उत्सवात चेंगराचेंगरीत सात जणांचा मृत्यू झाला,१० ऑगस्ट २०१५ झारखंडमधील देवघर शहरातील एका मंदिरात चेंगराचेंगरीत किमान ११ जणांचा मृत्यू आणि ५० जण जखमी झाले,१४ सप्टेंबर २०१४ आंध्र प्रदेशातील राजमुंद्री येथे 'पुष्करम' उत्सवाच्या उद्घाटनाच्या दिवशी भाविकांची मोठी गर्दी जमली होती गोदावरी नदीच्या काठावरील एका प्रमुख स्नानस्थळावर चेंगराचेंगरीत २७ यात्रेकरूंचा मृत्यू आणि २० जण जखमी झाले,२५ ऑगस्ट २०२४ ला मध्यप्रदेशातील सतना जिल्ह्यातील एका मंदिरात अफवेमुळे चेंगराचेंगरी झाल्यानं दहा यात्रेकरू ठार आणि २० हून अधिक जखमी झाले,१३ऑक्टोबर २०१३ मध्यप्रदेशातील दातिया येथील रतनगढ मंदिराजवळ चेंगराचेंगरीत ८९ जणांचा मृत्यू आणि १०० हून अधिक जखमी झाले,१४जानेवारी २०११ केरळमधील सबरीमाला मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत १०६ यात्रेकरू ठार तर १०० हून अधिक जखमी झाले,४ मार्च २०१० उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथील राम जानकी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६३ जणांचा मृत्यू झाला, ३०सप्टेंबर २००८ राजस्थानमधील जोधपूरमधील मेहरानगड किल्ल्याच्या परिसरात असलेल्या चामुंडा देवी मंदिरात चेंगराचेंगरीत २४४ लोकांचा गुदमरून मृत्यू झाला,३ ऑगस्ट २००६ हिमाचल प्रदेशातील नैना देवी मंदिरात चेंगराचेंगरीत सुमारे १५० भाविकांचा मृत्यू आणि ४०० हून अधिक जखमी झाले,२६ जानेवारी २००५ ला पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील वाई जवळील मंदेर देवी मंदिरात वायरिंगमध्ये शॉर्ट सर्किटमुळे ठिणग्या निघाल्यानं घाबरलेल्या हजारो भाविकांनी गर्दी केली होती. मंदिराकडे जाणाऱ्या अरुंद मार्गावर गर्दी झाल्याने चेंगराचेंगरी झाली व लोक एकमेकांवर पडल्याने २९१ जणांचा मृत्यू झाला तर २०० हून अधिक जण जखमी झाले,२७ ऑगस्ट २००३ नाशिक कुंभातील पवित्र स्नानादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत ३९ जणांचा मृत्यू झाला तर १४०जण जखमी झाले.चेंगराचेगरीच्या भयावह घटना पहाता त्या टाळण्यासाठी मंदिर प्रशासनाने गांभीर्याने लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे सर्वसामान्यांनी किंवा भाविकांनी गर्दीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्याठिकाणी आपण जावे की नाही याचा गंभीरतेने विचार करूनच गेले पाहिजे. मंदिर परिसरातील वाढत्या चेंगराचेंगरीच्या घटना पहाता मंदिर प्रशासनावर राज्य सरकारने व केंद्र सरकारने जातीने लक्ष देण्याची गरज आहे व त्यांच्या चुका उघड करून कारवाई करून त्यात सुधारणा करण्याची आज गरज आहे.देशातील संपूर्ण मंदिरे हे भारतीय संस्कृतीचे आस्थेचे प्रतिक आहे आणि मंदिर प्रशासन व सरकार यांच्यात तालमेल व्यवस्थित असला तर चेंगराचेंगरीच्या भयावह घटना सहज टाळता येतात. अशाप्रकारे वरील भयावह घटना टाळण्यासाठी भाविक, मंदिर प्रशासन, स्थानिक प्रशासन, राज्य सरकार व केंद्र सरकारने गांभीर्याने लक्ष केंद्रित केले पाहिजे व अशा घटनांच्या बाबतीत सतर्कता बाळगली पाहिजे.कारण या दुर्घटना आपण सहज टाळु शकतो. याकरीता सर्वांनीच 'जान है तो जहान है' हा मुलमंत्र अंगीकारला हवा आणि अशा गंभीर दुर्घटनांवर अंकुश लावला पाहिजे.

**– रमेश कृष्णराव लांजेवार**

# स्वत:च्या चुकीमुळे झालेल्या अपघातात मृत्यू झाल्यास कुटुंबीयांना भरपाई मिळणार नाही – सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली, दि. ३ (वृत्तसंस्था)– भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने वाहन चालवणाऱ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे जो भविष्यकाळात रस्त्यावरील वाहतूक नियमांचे पालन करण्यासाठी प्रेरणा देणारा ठरू शकतो. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की बेफिकीरपणे आणि वेगाने वाहन चालवणाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे झालेल्या अपघातात त्यांचा मृत्यू झाल्यास विमा कंपनी त्यांच्या कुटुंबीयांना भरपाई देण्यास बाध्य नाही.

हा निर्णय एन.एस. रवीश यांच्याशी संबंधित प्रकरणावर आधारित आहे. १८ जून २०१४ रोजी घडलेल्या या दुर्घटनेची सुरुवात तेव्हा झाली जेव्हा रवीश हे त्यांच्या वडील, बहीण आणि मुलांसह कारने प्रवास करत होते. मालनहल्लीजवळ त्यांच्या गाडीवरील नियंत्रण सुटले आणि भीषण अपघात झाला. या अपघाता मागील कारणे तपासताना असे स्पष्ट झाले की रवीश हे अत्याधिक वेगाने आणि बेपर्वाईने गाडी चालवत होते. त्यांच्या या निष्काळजीपणामुळेच हा अपघात घडला आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला. पोलिसांच्या तपासणीतही ही बाब स्पष्ट झाली होती. रवीश यांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी, मुलगा आणि पालकांनी विमा कंपनीकडे ८० लाख रुपयांची भरपाई मागितली होती. परंतु पोलिसांच्या आरोप पत्रात रवीश यांनाच या अपघातासाठी थेट जबाबदार ठरवण्यात आले होते. या आधारावर मोटार अपघात दावा न्या

याधिकरणाने (एमएसीटी) त्यांचा दावा फेटाळून लावला. या निर्णयावर असमाधानी असलेल्या कुटुंबीयांनी कर्नाटक उच्च न्यायालयात अपील दाखल केले.

त्यांनी आपला युक्तिवाद बदलत असा दावा केला की अपघात टायर फुटल्यामुळे झाला होता, रवीश यांच्या चुकीमुळे नाही. परंतु उच्च न्यायालयाने या दाव्याला फारसे महत्त्व दिले नाही.

उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, सर्व पुराव्यांचे परीक्षण करता मृत व्यक्ती त्यांच्या निष्काळजीपणामुळेच अपघाताला कारणीभूत ठरली होती. त्यामुळे विमा कंपनी भरपाई देण्यास बाध्य नाही, असा निर्णय त्यांनी दिला. अंतिम उपाय म्हणून कुटुंबीयांनी सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. न्यायमूर्ती पी.एस. नरसिंह आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठाने या संपूर्ण प्रकरणाचा सखोल अभ्यास केला.

सर्व पुराव्यांचे आणि कायदेशीर मुद्यांचे परीक्षण करून त्यांनी उच्च न्यायालयाच्या निर्णयाला मान्यता दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने आपल्या निर्णयात स्पष्टपणे नमूद केले, 'जेव्हा अपघात मृत व्यक्तीच्या स्वतःच्या निष्काळजीपणामुळे होतो, तेव्हा विमा कंपनीवर कोणतीही भरपाईची जबाबदारी राहात नाही.' हा निर्णय कायदेशीर तत्त्वावर आधारित आहे की कोणीही व्यक्ती स्वतःच्या चुकीचा फायदा घेऊ शकत नाही.

या निर्णयाचे व्यापक परिणाम दिसून येण्याची शक्यता आहे. यामुळे वाहनचालकांना अधिक जबाबदारीने आणि सुरक्षितपणे वाहन चालवण्यासाठी प्रेरणा मिळेल. रस्त्यावरील वेगवान आणि बेपर्वाह गाडी चालवणे हे केवळ स्वतःच्या जीवाला धोका नसून कुटुंबीयांच्या आर्थिक सुरक्षेलाही धोका आहे हे या निर्णयामुळे स्पष्ट झाले आहे. विमा कंपन्यांसाठी देखील हा निर्णय महत्त्वाचा आहे. यामुळे त्यांना अनावश्यक भरपाई देण्यापासून संरक्षण मिळेल आणि विमा दाव्यांबाबत स्पष्टता निर्माण होईल. तथापि, याचा अर्थ असा नाही की सर्व विमा दावे नाकारले जातील, फक्त निष्काळजीपणामुळे झालेल्या अपघातांमध्ये हा नियम लागू होईल. या निर्णयामुळे भविष्यकाळात वाहतूक नियमांचे पालन करण्यासाठी लोकांना अधिक प्रेरणा मिळेल आणि रस्त्यावरील सुरक्षिततेत सुधारणा होण्याची शक्यता आहे.

# नमित मल्होत्रा यांचा 'रामायण: द इंट्रोडक्शन' भारतातील ९ शहरांमध्ये भव्य लोकार्पण!

मुंबई : सुमारे २.५ अब्ज लोकांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू असलेली, ५,००० वर्षांपूर्वीची कथा आता नव्या रूपात साकारली जात आहे. जगातील सर्वात मोठ्या सिने-प्रकल्पांपैकी एक ठरणाऱ्या नमित मल्होत्रा यांची 'रामायण' या दोन भागांच्या थरारक श्रळींश-रलींळेप सिनेमॅटिक युनिव्हर्सचा प्रास्ताविक भाग 'रामायण: द इंट्रोडक्शन' आज जागतिक स्तरावर सादर करण्यात आला.

जगातील सर्वात महत्त्वाकांक्षी चित्रपटात्मक उपक्रमाच्या निर्मात्यांनी 'रामायण: द इंट्रोडक्शन' या जागतिक लॉन्चसह रामायणाच्या भव्य विश्वाचा अनावरण केला. ज्यामध्ये पौराणिक काळातील दोन सर्वात प्रतिष्ठित शक्तींमधील शाश्वत युद्धाचा मंच तयार करण्यात आला आहे: राम वि. रावण. या लॉन्चचा प्रसार संपूर्ण जगभर झाला. भारतातील नऊ शहरांमध्ये चाहत्यांसाठी खास स्क्रीनिंग्स आणि न्यूयॉर्कच्या टाइम्स स्क्वेअरमध्ये नेत्रदीपक बिलबोर्ड ताबा घेण्यात आला.

दृष्टीकोन असलेले चित्रपट निर्माते आणि निर्माता नमित मल्होत्रा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहनिर्माते म्हणून यश यांच्या सहभागाने, 'रामायण' या चित्रपटात ऑस्कर-विजेते तंत्रज्ञ, हॉलीवूडमधील आघाडीचे निर्माते आणि भारतातील मोठमोठ्या कलाकारांचा समावेश आहे. हे सर्व मिळून भारतीय संस्कृतीत रुजलेली ही महान गाथा एका आधुनिक सिनेमॅटिक युनिव्हर्सच्या स्वरूपात जगासाठी पुन्हा साकारत आहेत.

दिग्दर्शक नितेश तिवारी यांच्या कल्पक दिग्दर्शनाखाली, नमित मल्होत्रा यांच्या प्राईम फोकस स्टुडिओज व आठ वेळा ऑस्कर विजेते DNEG$ VF$X स्टुडिओ, तसेच यश यांच्या Monster Mind Creations यांच्या संयुक्त विद्यमाने साकारण्यात येणाऱ्या या भव्य चित्रपटाचा पहिला भाग दिवाळी २०२६ मध्ये आणि दसरा भाग दिवाळी २०२७मध्ये IMAX वर प्रदर्शित होणार आहे.

या भव्य प्रकल्पाच्या घोषणेनंतर भारतातील ९ प्रमुख शहरांमध्ये चाहत्यांसाठी खास स्क्रीनिंग्सचे आयोजन करण्यात आले, तर न्यू यॉर्कच्या टाइम्स स्क्वेअरवर भव्य बिलबोर्ड्सद्वारे जागतिक स्तरावर या प्रकल्पाची झलक सादर करण्यात आली.

कथा राम वि. रावण: एक शाश्वत संग्राम या विश्वाची समतोलता ब्रह्मा (सृष्टीकर्ता), विष्णू (पालक) आणि शंकर (संहारक) यांच्या त्रीमध्ये टिकून असते. मात्र या संतुलनातूनच उगम होतो एक अनोख्या राक्षस बालकाचा जो पुढे रावण बनतो. एक अमर, अजेय आणि विध्वंसक शक्ती. त्याचे उद्दिष्ट एकच विष्णूचा




नाश करणे.

याला थोपवण्यासाठी विष्णू स्वतः मानवाचा राम या क्षीण रूपात पृथ्वीवर अवतार घेतो. इथूनच सुरू होते एक अखंड लढाई.

राम वि. रावण, माणूस वि. अमरता, प्रकाश वि. अंध:कार, हीच आहे रामायण एका विश्वयुद्धाची, नशिबाच्या वळणांची आणि सत्त्वाच्या विजयाची अमर कथा जी आजही अब्जोंच्या श्रद्धा व मूल्यांना आकार देते. तगडी कलाकार मंडळी व जागतिक दर्जाचा तांत्रिक बाजू. कलाकार: रणबीर कपूर राम यांच्या भूमिकेत. यश रावण या सशक्त भूमिकेत (सह-निर्मातेही). साई पल्लवी सीता, सनी देओल हनुमान, रवी दुबे , लक्ष्मण या वेगळ्या अविष्कारी भूमिकेत

तांत्रिक टीम– हँस झिमर व ए. आर. रहमान प्रथमच एकत्र संगीत दिग्दर्शन

टेरी नोटरी – गाय नॉरिस ॲक्शन कोरिओग्राफी. रवि बन्सल,

रॅम्सी एव्हरी प्रॉडक्शन डिझाईन

भारताकडून जगाला एक सांस्कृतिक देणगी

नमित मल्होत्रा निर्माते आणि ऊ्छएत्र्ञ्च चे सीईओ, सांगतात, ङ्गरामायण हा केवळ एक चित्रपट नाही, तर हे एक सांस्कृतिक चळवळ आहे. आपण आपली परंपरा जागतिक पातळीवर नव्या सादरीकरणात आणतो आहोत. आतापर्यंत रामायण विविध प्रकारे पाहिलं गेलं आहे, पण आता आपण त्याला एका अशा भव्य आणि प्रगत रूपात आणतोय, जे जागतिक चित्रपटमंचावर भारताची ओळख ठरू शकेल.

नितेश तिवारी, दिग्दर्शक, म्हणतात, ही कथा आपल्यात खोल रुजलेली आहे. ती केवळ पौराणिक नसून एक शाश्वत सत्य आहे. यामध्ये भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे. हा आत्मा सांभाळून, जागतिक स्तरावर तिचं नव्या भव्यतेत सादरीकरण करणं हे माझं कर्तव्य आणि सन्मान आहे.ङ्घ

प्रस्ताविक संस्था परिचय–

Prime F$ocus S>tudios– नमित मल्होत्रा यांनी स्थापन केलेले हे स्टुडिओ जागतिक स्तरावर सिनेमा, टीव्ही, गेमिंगसाठी नावीन्यपूर्ण व दर्जेदार कंटेंट निर्मिती करतात. ऊ्छएत्र्ञ्च च्या आंतरराष्ट्रीय यशाची आणि तांत्रिक कौशल्याची ताकद या स्टुडिओला लाभली आहे.

प्रसिद्ध अभिनेता यश यांची निर्मिती संस्था, जी सर्जनशील प्रतिभेला चालना देणाऱ्या आणि नव्या दृष्टिकोनातून कथा सादर करणाऱ्या चित्रपटांची निर्मिती करत आहे. "Toxic" आणि "Ramayana" हे त्यांचे दोन प्रमुख प्रकल्प आहेत. रामायण एक भारतीय आत्म्याची जागतिक प्रस्तुती, खचअद आणि आधुनिक सिनेमा माध्यमांची पराकाष्ठा लवकरच तुमच्या समोर येतेय!

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, पूकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# १५ ऑगस्टपर्यंत सुनावण्यांची सर्व प्रकरणे ईक्युजे पोर्टलवर नोंदवा-विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

## अर्धन्यायीक व सेवा विषयक प्रकरणांच्या सुनावण्यांबाबत विभागीय प्रशिक्षण

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अपर आयुक्त विजयसिंह देशमुख यांच्या संकल्पनेतून अर्धन्यायीक व सेवा विषयक प्रकरणांची सुनावणी आता दृकश्राव्य (ऑनलाईन) प्रणालीद्वारे होणार आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील सबंधित यंत्रणेने १५ ऑगस्ट, २०२५ पर्यंत सुनावण्यांची सर्व प्रकरणे ईक्युजे पोर्टलवर नोंदविण्याबाबतचे निर्देश विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आज छत्रपती संभाजीनगर विभागातील आठही जिल्हयातील अपर जिल्हाधिकारी, उपविभागीय प्रांत अधिकारी, तहसीलदार तसेच संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी अपर आयुक्त विजयसिंह देशमुख, डॉ. अनंत गव्हाणे, खुशालसिंह परदेशी यांच्यासह सबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त श्री. पापळकर म्हणाले, छत्रपती संभाजीनगर महसूली विभागातील आठ जिल्ह्यांतील प्रकरणांमध्ये पक्षकार व विधिज्ञांना प्रत्यक्ष उपस्थित राहावे लागते, त्यामुळे वेळ व आर्थिक नुकसान होत होते. आता ही सुनावणी ऑनलाईन होणार असल्याने या दोन्ही गोष्टींची बचत होईल. जिल्हा पातळीवर अपर जिल्हाधिकारी याबाबतच्या कामकाजाचे नियंत्रण करतील. महसूल विभागाच्या न्यायव्यवस्थेमध्ये पारदर्शकता आणणयासाठी ऑनलाईन सुनावण्या महत्त्वाच्या ठरतील. अपर जिल्हाधिकारी, उपविभागीय प्रांत यांनी केसेसबाबतच्या डॅशबोर्डचे नियंत्रण अत्यंत नियोजनपूर्वक करावे. शेतकरी, नागरिक यांना वेळेत न्याय देण्यासाठी या प्रक्रियेत अपर जिल्हाधिकारी यांचे योगदान महत्त्वाचे ठरणार आहे, त्यादृष्टीने त्यांनी नियोजन करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

अपर आयुक्त विजयसिंह देशमुख म्हणाले, विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत प्रलंबित अर्धन्यायीक प्रकरणांचे ‘सुनावणी बोर्ड’ व ‘बजावणी बोर्ड’ असे वर्गीकरण करण्यात आले आहे. सुनावणी बोर्डासाठी सोमवार, मंगळवार व बुधवार हे दिवस निश्चित केले आहेत. बजावणी बोर्डासाठी गुरुवारचा दिवस राखीव आहे.

बजावणी बोर्डामध्ये नोटीस बजावणी न झालेली किंवा आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न झालेली प्रकरणे घेतली जातात. या बोर्डाचे काम सहायक महसूल अधिकारी व महसूल सहाय्यक यांच्या स्तरावर पार पाडले जाते. सुनावणी बोर्डामध्ये परिपक्व (संपूर्ण) प्रकरणे घेतली जातात, जे ३ ते ४ सुनावण्यांमध्ये निकाली काढली जातात. निर्णय झाल्यानंतर ँ ण्दल्ू वेबसाईटवर ते अपलोड केले जातात आणि प्रमाणित प्रती पक्षकारांना वितरित केल्या जातात. या प्रणालीमुळे पारदर्शकता वाढेल, तक्रारी कमी होतील आणि वेळेचा तसेच खर्चाचा मोठा बचाव होईल. नोंदविलेल्या केसेस, आपल्या कार्यालयातील स्थिती, व




ताळमेळ, प्रत्येक प्रकरणनिहाय छाननी, स्थितीचा डॅशबोर्ड, कालावधीनुसार प्रलंबित केसेस याबाबतही श्री. देशमुख यांनी यावेळी माहिती दिली.

यावेळी श्री. देशमुख यांनी कामकाज प्रलंबित राहणार नाही, यादृष्टीने विशिष्ट निर्देश व काही प्रपत्रे घालून दिली आहेत.तसेच अर्धन्यायिक प्रकरणामध्ये कायदेशीरदृष्यटया निर्माण होणाऱ्या अडचणीबाबत मार्गदर्शन केले. प्रकरणे दाखल होताना त्याची काटेकोरपणे छाननी करण्याच्या सूनही त्यांनी दिल्या.

यावेळी अपर जिल्हाधिकारी, उपविभागीय प्रांत अधिकारी, तहसीलदार यांच्यासह सबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# भाविकांना सुरक्षा, स्वच्छता आणि सेवा द्या-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

## आषाढी एकादशी यात्रा: पूर्वतयारी आढावा बैठक

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील प्रती पंढरपुर येथे आषाढी एकादशीनिमित्त १० ते १२ लख भाविक येण्याची शक्यता आहे.वारकरी भाविकांना सुरक्षा, स्वच्छता, सेवा देण्यासाठी सर्व यंत्रणानी दक्ष रहावे. प्रत्येक विभागाने समन्वयाने जबाबदारी पार पाडावी, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

आषाढी एकादशी पूर्वतयारी आढावा बैठकीस पोलीस उपआयुक्त पंकज अतुलवार, पोलिस निरीक्षक वाळूज एम.आय.डी.सी. रामेश्वर गाढे, एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक योगेश शेळके, प्रादेशिक परिवहन अधिकारी राजकुमार कुमठाळे, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अभिनव बालुरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.महेश लड्डा, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, अन्न सुरक्षा अधिकारी प्रशांत कुचेकर, कार्यकारी अभियंता वाळूज सुरेश गायकवाड, प्रभारी तहसिलदार के.व्ही.वाघमारे, राज्य परिवहन महामंडळाचे वाहतूक निरीक्षक राजेश मोटे, स्मार्ट सिटी बस वाहतूक शाखेचे व्यवस्थापक ए.बी.वाघ, ग्रामपंचायत पंढरपूर ग्रामपंचायत अधिकारी पी.अे तुपे, पंढरपूर ग्रामपंचायत माजी सरपंच शेख अख्तर शेख आरिफ, पंढरपूर मंदिराचे विश्वस्त राजेंद्र दत्तात्रय पवार, सचिव विष्णू झळके उपस्थित होते. जिल्हाधिकारी स्वामी यांनी निर्देश दिले की भाविकांना विनासायास दर्शन व्हावे. प्रत्येक भक्त व्हीआयपी समजून त्यांना सेवा देण्यात यावी. मंदीर परिसरात विक्री स्टॉल, फिरते विक्रेते यांच्यामुळे भविकांना नाहक त्रास होऊ नये. खाद्य पदार्थ विक्री स्टॉल वर अन्न



औषध प्रशासनाने विशेष लक्ष ठेवावे. आरोग्य विभागाने आपले संपूर्ण पथक यात्रा काळात कार्यन्वित ठेवावे. २४ तास अॅम्बुलन्सची सुविधा उपलब्ध ठेवावी. तसेच डॉक्टर, नर्स व स्वंयसेवी संस्थाची मदत घेऊन रक्तदान करण्यास भाविकांना प्रोत्साहित करावे. विद्युत विभागाने मंदीर परिसरातील रहाट पाळणे आदी विद्युत जोडण्यांना परवाने देताना विशेष काळजी घ्यावी.रात्रीच्या वेळी विशेष पथकांमार्फत निगराणी करावी. राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध मद्य विक्री, वाहतुकीवर विशेष लक्ष ठेवावे. सार्वजनिक बांधकाम विभागाने मंदिराकडील रस्त्याची दुरुस्ती करावी व नगर नाका ते मंदीरपर्यत बंद पडलेले विद्युत खांब दुरुस्ती करावी.

पोलीस प्रशासनाने भविकांच्या तसेच महिला बालके यांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे. छत्रपती संभाजीनगर – पुणे महामार्ग हा एमआयडीसी वाळूजला लागून असल्याने वाहतूक शाखेने वाहतूक मार्गात बदल करुन जड व लहान वाहनांना पर्यायी रस्ता उपलब्ध करुन द्यावा. भाविकांना संरक्षण द्यावे. तसेच चोरी व अन्य अनुचित प्रकार रोखण्यासाठी साध्या वेशात पोलीस तैनात करावे.सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून लक्ष ठेवावे. भाविकांना आवश्यक सूचना देण्यासाठी ध्वनीक्षेपण यंत्रणा कार्यान्वित करावी. कमीत -कमी वेळेत भविकांनी दर्शन घेऊन मंदीर परिसरात होणारी गर्दी टाळावी. तसेच मंदीर परिसरात मंदीराचे स्वंयसेवक, यात्रेच्या काळातील स्वंयसेवी संस्था यांची मदत घेऊन पोलीस प्रशासनाने भाविकांना मार्गदर्शन करावे. हरवलेल्या व्यक्ती, बालके यांच्या साठी स्वतंत्र यंत्रणा ठेवावी.

शहरातून पंढरपूर कडे जाणारा एक रस्ता खुला ठेवावा. हलके तसेच राज्य परिवहन बसेस, स्मार्ट सिटी बसेस, रिक्षा चालक यांच्यात योग्य समन्वय साधून भाविकांचा प्रवास सुलभ होण्यासाठी ए.एस.क्लब येथे योग्य थांबा उपलब्ध करुन देण्यात यावा. तेथे २४ तास मार्गदर्शक उपलब्ध करुन देण्यात यावा. तसेच योग्य दिशादर्शक फलक उपलब्ध करुन देण्यात यावे. यात्रा संपल्यानंतर संपूर्ण परिसराची स्वच्छता मोहिम महानगरपालिकेने करावी. तसेच यात्रा काळातही स्वच्छतेकडे महानगरपालिकेने विशेष लक्ष द्यावे. तसेच फिरते सार्वजनिक शौचालाय जास्तीत जास्त संख्येने उपलब्ध करुन द्यावे, अशाही सूचना जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिल्या. भाविकांना सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यास प्रशासन कटिबद्ध आहे असे यावेळी जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले.

## मनपा च्या वतीने दुकान/ व्यवसाय परवाना लागू; परवाना शिवाय व्यवसाय बेकायदेशीर

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीनेआयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या आदेशानुसार दुकान /व्यवसाय परवाना लागू करण्यात आला आहे. मनपा हद्दीतील सर्व संबंधित व्यावसायिक, दुकानदार व नागरिकांचे सार्वजनिक आरोग्य, सुरक्षितता व नागरी सुविधा लक्षात घेता महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१३, ३७६, ३७७, ३७८ व ३८६ अन्वये दुकान परवाना /व्यवसाय परवाना लागू करण्यात येत आहे. या अंतर्गत सर्व व्यवसायिकांनी आपला परवाना करुन घेणे अनिवार्य आहे.

**दुकान परवाना/व्यवसाय परवाना कोणासाठी आवश्यक आहे?**

शहरातील व्यवसायांचे सुयोग्य नियोजन, कायदेशीर नियंत्रण, अग्निसुरक्षा, पर्यावरण व नागरी आरोग्याच्या दृष्टीने लायसन्स घेणे आवश्यक आहे. त्यामुळे कोणत्याही दुकान, उद्योग, कार्यालय, सेवा केंद्र यांचे व्यवसाय लायसन्सशिवाय चालवणे कायदेशीर गुन्हा ठरेल.

**परवाना प्राप्त करून घेण्याची पद्धत**

संबंधित दुकानदार व व्यवसायिकांनी महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर किंवा संबंधित प्रभाग कार्यालयात जाऊन आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावा. परवाना शुल्क ऑनलाईन किंवा प्रत्यक्ष वसूल करण्यात येईल.

**वसुली संदर्भातील सूचना-** निर्धारित मुदतीत परवाना शुल्क भरले नाही तर विलंब शुल्क आकारण्यात येईल. तसेच, वारंवार दुर्लक्ष करणाऱ्या व्यावसायिकांवर दंडात्मक कारवाई केली जाईल किंवा संबंधित आस्थापना सील करण्यात येऊ शकते. या बाबत महानगरपालिकेच्या अधिकृत संकेत स्थळावर परवाना अर्ज, शुल्क तपशील, आवश्यक कागदपत्रांची यादी व इतर सर्व माहिती उपलब्ध आहे. नागरिकांनी शहराच्या सुव्यवस्थेसाठी सहकार्य करावे व आपल्या व्यवसायासाठी वेळेत परवाना प्राप्त करून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी असे आवाहन मनपा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कामकाजाचा विभागीय आयुक्तांकडून आढावा



छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- विभागीय आयुक्त तथा छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कामकाजाचा आढावा घेतला. प्राधिकरणाच्या विविध क्षेत्रामध्ये नियोजनाच्या दृष्टीकोनातून करावयाच्या उपाययोजनांबाबत चर्चा करून संबंधित यंत्रणेला याबाबतची कार्यवाही विहित कालमर्यादेत करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आढावा बैठकीवेळी महानगर नियोजनकार हर्षल बावीसकर, नगर प्रशासन विभागाचे उपायुक्त देविदास टेकाळे, सह महानियोजनकार रवींद्र जायभाय, तहसीलदार सुनंदा पारवे, उपमुख्यलेखाधिकारी व वित्त अधिकारी साधना बांगर, सहायक संचालक सुमित मोरावकर यांच्यासह प्राधिकरणाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त श्री.पापळकर म्हणाले, औद्योगिक व वाणिज्य वापर सुरू असलेल्या प्रदेशात दिवसेंदिवस वाढणारे अतिक्रमण रोखण्यासाठी पथक स्थापन करावे. स्थापन केलेल्या पथकाने क्षेत्रीय दौरे करून अतिक्रमण धारकांना कायद्यातील तरतूदीनुसार नोटीसा बजावून केलेल्या कार्यवाहीचा साप्ताहिक अहवाल सादर करावा. तसेच प्राधिकरण क्षेत्रातील शासकीय जमीनींची नियमितपणे स्थळ पाहणी करून या जमिनीवरील अतिक्रमण, अवैध उत्खनन, सांडपाणी, घनकचरा इत्यादीबाबत प्रतिबंधात्मक व दंडात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

महानगर आयुक्त श्री.पापळकर यांनी प्राधिकरणाच्या विभागनिहाय विविध मुद्यांवर चर्चा करून विहित मुदतीत कार्यवाही करा अशा सूचना संबंधित विभाग प्रमुखांना दिल्या. नियोजन, अतिक्रमण, जमीन मालमत्ता, तसेच आस्थापना विभागाचा आढावा घेण्यात आला. यावेळी प्राधिकरणाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# विभागीय आयुक्त कार्यालयात कृत्रिम बुद्धिमत्तेबाबत प्रशिक्षण

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- राज्य शासनाच्या १५० दिवस कार्यक्रमा अंतर्गत तसेच प्रशासनातील कामकाज अधिक गतिमान, अचूक व पारदर्शक करण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर या विषयावर एमकेसीएलचे विभागीय व्यवस्थापक विनायक कदम यांनी मार्गदर्शन केले. विभागीय आयुक्त कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी या प्रशिक्षणात सहभाग घेतला.

विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या उपस्थितीत प्रशिक्षणाला प्रारंभ झाला. यावेळी अपर आयुक्त विजससिंह देशमुख, डॉ. अनंत गव्हाणे, खुशालसिंह परदेशी, एमकेसीएल मराठवाडा विभाग मुख्य मार्गदर्शक बालकिशन बलदावा, विभागीय समन्वयक गजानन कुलथे, जिल्हा समन्वयक निलेश झाल्टे उपस्थित होते.

विभागीय आयुक्त म्हणाले, कार्यालयीन कामकाजात योग्य पदधतीने कृत्रिम



बुद्धिमत्तेचा वापर वाढविल्यास नागरिकांना सेवा गतीने मिळण्यास मदत होईल. अधिकारी तसेच कर्मचारी यांनी आपल्या कामकाजात एआय तंत्राचा वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

एमकेसीएलचे विभागीय व्यवस्थापक विनायक कदम म्हणाले, कृत्रिम बुध्दीमत्ता हे तंत्रज्ञान वापरुन कार्यालयीन कामकाज कमी वेळात प्रभावीपणे करता येते. दैनंदिन प्रशासकीय कामकाजामध्ये कमी वेळेत प्रभावीपणे काम करण्यासाठी एखादे व्हीजन डॉक्युमेंट सारखे दस्तावेज अवघ्या काही मिनिटात तयार करण्यासाठी कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर चांगल्याप्रकारे करता येऊ शकते. त्यासाठी काटेकोरपणे त्याच्याकडून काम करुन घेता आले पाहिजे, असेही ते म्हणाले.

श्री कदम यांनी संगणकीय सादरीकरण करतानाच काही प्रात्याक्षिक करुन दाखवून कार्यालयीन कामकाजामध्ये कृत्रिम बुध्दमत्तेचे महत्व प्रभावी असल्याचे सांगितले. चॅट जीपीटी, भाषिनी, डेमो एआय, हेड्रा, ग्रोक एआय, डीप सीक, जनरेटीव्ह एआय आदींचा वापर कार्यालयीन कामकाजामध्ये कसा करायचा त्याबाबत सविस्तर माहिती दिली. मजकूर टायपिंगसाठी गुगल डॉक्स, गुगल लेन्स, शुध्दलेखनाच्या चुका दुरुस्त करण्यासाठी ग्रामरली, त्याचबरोबर संगणकीय सादरीकरणासाठी एआय पीपीटी, प्रेझेटेंशन.एआय, आर्ट वर्कसाठी कॅनवा अॅप याबाबतची माहिती दिली.

कार्यशाळेदरम्यान सहभागी कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष तांत्रिक साधनांचा वापर करून पाहिला. ई-मेल लेखन, नोंदी ठेवणे, दस्तऐवजांची मांडणी, भाषांतर व अहवाल लेखन यासाठी एआयचा प्रभावी वापर कसा करता येतो याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. यावेळी अपर आयुक्त विजयसिंह देशमुख यांनी विभागीय आयुक्त कार्यालयात एआय तंत्राचा वापर वाढविण्यासाठी एक टिम तयार करण्यात येणार असून यामध्ये प्रत्येकाचा सहभाग महत्वाचा ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. आभार तहसीलदार अरूण पावडे यांनी मानले.

(पान १ वरुन)

### भाजप डरपोक लोकांची...

नाशिक मधील ठाकरे गटाचे माजी नगरसेवक आणि महानगर प्रमुख मामा राजवाडे देखील भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. या सर्वांवर गुन्हा दाखल झालेला असून अटक होण्याच्या भीतीने ते पोलिसांच्या रेकॉर्डनुसार फरार आहेत. असे फरार आणि डरपोक लोकच भाजपमध्ये प्रवेश करत असल्याचा आरोप राऊत यांनी केला आहे. तुमच्यावर भ्रष्टाचार, दंगे, बलात्कार असे कोणते गुन्हे दाखल असेल तरच तुम्हाला भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश दिला जातो, असा आरोप संजय राऊत यांनी केला आहे.

### संत ज्ञानेश्वर माऊली व...

करीत वारकऱ्यांना मंत्रमुग्ध केले. याच दरम्यान अचानक पावसाला सुरवात झाली अन् सोहळ्यातील भाविक चिंब न्हाऊन निघाले. दुपारी पावणेचार वाजता माऊलींचा पालखी सोहळा बंधू भेटीसाठी दाखल झाला. माऊलीचा रस्त्याच्या डाव्या बाजूला येऊन थांबल्यामुळे सोपानकाकांचा सोहळा माऊलीच्या बाजूला गेला.

### पंतप्रधान मोदींचा घानामध्ये...

लोकशाही म्हणून, भारत हा जगासाठी एक शक्तीस्तंभ आहे. एक मजबूत भारत स्थिर आणि समृद्ध जगाला हातभार लावेल. काल घानाचे अध्यक्ष जॉन महामा यांच्याकडून राष्ट्रीय पुरस्कार स्वीकारणे माझ्यासाठी सन्मानाची गोष्ट आहे. या सन्मानाबद्दल मी भारताच्या १.४ अब्ज जनतेच्या वतीने घानाच्या जनतेचे आभार मानतो. आमची मैत्री तुमच्या प्रसिद्ध शुगर लोफ अननसापेक्षाही गोड आहे. पंतप्रधान मोदी २ जुलै ते १० जुलै दरम्यान परदेश दौऱ्यावर आहेत. या काळात ते ५ देशांना भेट देतील. घाना हा त्याचा पहिला थांबा आहे. पंतप्रधान मोदींना बुधवारी घानाचा सर्वोच्च सन्मान ’द ऑफिसर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार ऑफ घाना’ प्रदान करण्यात आला. दोन्ही देशांनी ४ वेगवेगळे करार (एमओयू) देखील केले.

# पडेगाव ते मिटमिटा रोडवर ५८५ बांधकामे निष्कासित









छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या आदेशानुसार आणि नियंत्रण अधिकारी अतिक्रमण विभाग संतोष वाहुळे यांच्या उपस्थितीत पडेगाव ते मिटमिटा मनपा शाळा दरम्यान केलेल्या कारवाईत एकूण ५८५ एवढी पक्की आणि कच्ची बांधकामे ज्यामध्ये हॉटेल,लॉज, दुकाने, शेड,कंपाऊंड,ओटे,गॅरेज,वॉशिंग सेंटर,कमान,जाहिरात फलक,इ. निष्कासित करण्यात आले. सदर कारवाई मध्ये महानगरपालिकेच्या ३५० अधिकारी व कर्मचाऱ्यांचा तर पोलीस विभागाचे २५० अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

या कारवाईसाठी ३० जेसीबी, ८पोकलॅन,१५ टिप्पर, २ रूग्णवाहिका, २ कोंडवाडा वाहने,२ अग्निशमन बंब,५ इलेक्ट्रिक हायड्रॉलीक वाहने इ. वाहनांचा समावेश होता. सदरील कारवाई मध्ये नगररचना विभागाचे उप संचालक मनोज गर्जे,कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) अमोल कुलकर्णी, पोलीस सहायक आयुक्त रणजीत पाटील, अतिक्रमण उपायुक्त सविता सोनवणे,सहाय्यक आयुक्त अर्जून गिराम,प्राजक्ता वंजारी,अर्चना राजपूत,रमेश मोरे,संजय सुरडकर, अशोक गिरी, समीउल्लाह,भारत बिरारे, राहूल जाधव,नईम अन्सारी व इमारत निरीक्षक कुणाल भोसले, शिवम घोडके,सागर श्रेष्ठ, तृप्ती जाधव,सय्यद जमशेद, सय्यद मजहर अली, नगररचना विभागाचे सौरभ साळवे, सूरज संवडकर,राहूल मालखेडे, शिवाजी लोखंडे व नागरी मित्र पथकाचे प्रमोद जाधव सहभागी होते.